अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | सोमवार, दि.१७ एप्रिल २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : १९८ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

## अर्जुनचा पायगुण; मुंबईचा विजय

**मुंबई** : अर्जुन तेंडुलकरच्या पहिल्याच सामन्यात मुंबई इंडियन्सने दणदणीत विजय साकारला. मुंबईला यापूर्वीच्याच सामन्यात सहा विकेट्स राखून मोठा विजय मिळवता आला होता. पण तो विजय अखेरच्या षटकात मिळाला होता. पण या सामन्यात मात्र मुंबई इंडियन्सने दमदार विजय मिळवला. वेंकटेश अय्यरच्या शतकाच्या जोरावर केकेआरने १८५ धावा केल्या होत्या. या आव्हानाचा पाठलाग करताना मुंबईने धडाकेबाज फलंदाजी केली आणि त्यांनी आपला या हंगामातील दुसरा विजय नोंदवला. केकेआरच्या १८६ धावांचा पाठलाग करायला मुंबईचा संघ उतरला आण सर्वांनाच धक्का बसला. कारण मुंबईच्या संघाने इम्पॅक्ट प्लेअर म्हणून चक्क रोहित शर्माला उतरवले होते. रोहित आणि इशान यांनी यावेळी चांगली सुरुवात केली.

### आयपीएल सामना क्र.२४

Vs

बेंगळूर रॉयल चायलेंजर्स विरुद्ध चेन्नई सुपर किंग्ज

वेळ : सायं.७.३० वा.

स्थळ : एम.चिन्नास्वामी स्टेडियम, बंगळूर

# राष्ट्रवादीत सुरू झालाय ‘सामना’ राऊतांचा अजितदादांवर ‘निशाणा’

## पवार भडकले-कारण नसताना वावड्या का उठवता?

**सुराज्य/विशेष प्रतिनिधी**



राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते अजितदादा हे आपल्या गटातील १५ आमदारांना सोबत घेवून भाजपाच्या आश्रयाला जाणार असल्याची ‘बंद दाराआड’ची माहिती आता उजेडात येवू लागल्याने राजकीय क्षेत्रात नवे वादळ उठले आहे. उद्धव ठाकरे गटाचे प्रवक्ते खा.संजय राऊत यांनी ‘सामना’मधून या बंडाची चिरफाड केल्याने अजितदादांची चिडचिड वाढली आहे. मुख्यमंत्री शिंदे गटाचे १६ आमदार अपात्र ठरले तरी हे सरकार तरणार आहे, तेव्हा उगाच माझ्याविषयी चित्र रंगवू नका, अशा शब्दात अजितदादांनी पत्रकारांना फटकारले. हे कमी म्हणून की काय? शिंदे गटाचे आ.संजय शिरसाट व वंचित बहुजन आघाडीचे नेते अ‍ॅड.प्रकाश आंबेडकर यांनी राजकीय गौप्यस्फोट केल्याने राजकीय क्षेत्रात खळबळ उडाली आहे. पुतण्याच्या बंडाला काकांची मूक संमती असून ८ एप्रिलला प्रफूल्ल पटेल, अजितदादा व सुनील तटकरे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याशी ठरवून बैठक घेतल्याचा दावा शिरसाट यांनी केला आहे. तर येत्या १५ दिवसात दोन ठिकाणी राजकीय बॉम्बस्फोट होणार असल्याचे भाकित आंबेडकर यांनी वर्तवल्याने राजकीय पंडितांच्या भुवया उंचावल्या आहेत.

ठाकरे गटाचे खा. संजय राऊत यांनी ’सामना’मधून राष्ट्रवादी फोडण्याचा ‘सिझन-२’ आल्याचा दावा केल्याने राजकिय पंडित चक्रावून गेले आहेत. दरम्यान भाजपात जाणाऱ्यांची राजकिय आत्महत्या ठरेल, असे शरद पवार व उद्धव ठाकरे यांनी म्हटल्याचा गौप्यस्फोट करून राऊतांनी अजितदादांवर निशाणा साधला आहे.

भाजपकडून आता राष्ट्रवादी फोडण्यावर लक्ष केंद्रीत करण्यात आल्याचा दावाही केला जात आहे. याचा भंडाफोड राऊतांनी केला आहे. ठाकरे यांनी शरद पवारांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतली. त्यात झालेल्या चर्चेची माहिती राऊतांनी जगजाहीर करून टाकल्याने राष्ट्रवादी कॉंग्रेस पेचात सापडली आहे.

कोणालाही मनापासून सोडून जायचे नाही, पण कुटुंबाला टार्गेट केले जात आहे. कुणाला काही व्यक्तिगत निर्णय घ्यायचे असतील तर तो त्यांचा प्रश्न, पण ’पक्ष’ म्हणून आम्ही भाजपबरोबर जाण्याचा निर्णय घेणार नाही.

जे आता भाजपबरोबर जातील, ते राजकिय आत्महत्या करतील, असे पवार-ठाकरे यांचे मत पडले, असा दावा राऊतांनी केला आहे. त्यांचा हा दावा म्हणजे एकूणच अजितदादांवर रोख असल्याचे मानले जात आहे.

### अजितदादांची कोंडी, शरदरावांची गोची...

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या एकच चर्चा सुरू आहे. विरोधी पक्षनेते अजित पवार भविष्यात काय करतील? १५ आमदारांसह ते भाजपात सामील होतील, असे अयोध्येत गेलेले शिंदे व भाजपचे आमदार छातीठोकपणे सांगत होते. या सगळ्यांवर परखड खुलासा अजित पवार यांनीच करायला हवा,असे नमूद करून राऊत यांनी अजितदादांची कोंडी केली आहे. सिल्व्हर ओकच्या बैठकीतील काही गुपिते उघड करून राऊतांनी शरदरावांचीही गोची करून टाकली आहे.

### अजितदादांचे गणित...

शिंदे गटातील १६ आमदार अपात्र ठरवल्यानंतरही हे सरकार राहील, असा दावा अजितदादांनी नागपूर येथे बोलताना केला. ते म्हणाले,अपक्ष धरून भाजपाकडे ११५ आमदार आहेत. शिंदेंकडे ४० आमदार आहेत. ही संख्या १५० होते. शिवाय १० अपक्ष आमदार युतीसोबत येतील. म्हणजे ही संख्या १६५ होते. त्यातील १६ आमदार कमी झाले तर त्यांच्याकडे १४९ आमदार उरतात. बहुमतासाठी १४५ आमदारांची गरज आहे. कारण नसताना वावड्या उठवण्याचे काम का सुरू आहे? आपण वस्तुस्थिती मान्य केली पाहिजे.

### शिरसाट काय म्हणाले...

एका मराठी चॅनेलशी बोलताना आ.शिरसाट म्हणाले, ठाकरेंना बोलावून शरद पवारांनी इशारा दिला असावा. दीड तासांची बैठक चहा, पाणी करून किंवा एक वाक्य बोलून होत नसते. राष्ट्रवादी सत्तेशिवाय राहत नसून, त्यासाठी ते कुणाबरोबरही युती करण्यात तयार असतात. त्यांचा कल भाजपाकडे आहे. राष्ट्रवादीतील काही लोक फुटतील. कारण, याला शरद पवारांची मूक संमती आहे. अजित पवारांना त्यांची कातडी वाचवायची आहे. आम्ही राष्ट्रवादीला बरोबर घेणार नाही. भाजपाने काय करावे? हा त्यांचा प्रश्न आहे.

### आंबेडकरांचे भाकित

वंचित बहुजन विकास आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी महाराष्ट्राच्या राजकारणाबाबत खळबळजनक भाकित पुण्यात बोलताना केला. ‘येत्या १५ दिवसांत राज्यात दोन ठिकाणी मोठे राजकीय बॉम्बस्फोट होतील, असे ते म्हणाले. त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. त्यामुळे आपण १५ दिवस वाट बघुया. यावेळी त्यांना राज्यातील सरकार पडणार का? असे विचारले असता, येत्या १५ दिवसांत सर्वांना सर्वकाही समजेल, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

## मोटारसायकलला कारची धडक;एक ठार



**मोहोळ** : पेनुर कडे जाणाऱ्या एका मोटारसायकल स्वारास पाठीमागून पंढरपूर कडे जाणाऱ्या कारने जोरदार धडक देऊन झालेल्या अपघातात एक जण जागीच ठार झाल्याची घटना १५ एप्रिल रोजी सायकांळी ५ वाजनेचे सुमारास पेनुर हद्दीत घडली.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार भिमा सह कारखान्यात नोकरीस असलेले अरूण शिवाजी देशमुख वय ५७ रा. पाटकुल हे टि.व्ही. एस.एक्सल मोटार सायकल क्र एम.एच.१३/बी.सी. ५३०९ वरून पाटकुल हुन पेनुरकडे जात असताना, पेनुर हदीत माने वस्तीचे जवळील ओढयाचे पुलावर भरदाव वेगाने पंढरपुरकडे जाणारी कार क्र एम.एच.११/वाय. ३८६१ या कारने पाठीमागुन मोटार सायकलला जोरदार धडक देऊन झालेल्या आपघातात मोटार सायकल वर आसनारे अरूण शिवाजी देशमुख डिवाईडरला धडकुन गंभीर जखमी झाले त्यांना तात्काळ उपचारास ग्रामीण रूग्णालय मोहोळ येथे आणले असता त्यांचा उपचारापूर्वीच मृत्यु झाल्याचे डॉक्टरानी सांगीतले.

## किरकोळ कारणावरून मारहाण करत पिस्टल काढले; पाच जणांवर गुन्हा

**सुराज्य/सोलापूर**



किरकोळ कारणावरून शिवीगाळ करत लाथा बुक्क्यांनी मारहाण करुन पिस्टल बाहेर काढून मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी पाच जणांविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना दि.१५ एप्रिल रोजी रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास युवा भीमसेना मंडळ राजेश पायलट चौक जुना विडी घरकुल येथे घडली. याप्रकरणी योगीनाथ प्रभाकर काळे (वय-३१, रा.नितीन नगर, अक्कलकोट रोड) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून सद्दाम शेख, रमजान बागवान, गणेश भोसले, अमजद पठाण, सलमान उर्फ वांटेड (पूर्ण नाव माहित नाही, सर्व रा. सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, दीपक वैकुंठ श्रीगण याला वरील संशयित आरोपी यांनी मिळून शिवीगाळ करून लाथा बुक्क्यांनी मारहाण करत होते. त्यावेळी फिर्यादी योगीनाथ काळे हे भांडण सोडवण्यासाठी गेले असता, वरील संशयित आरोपी यांनी योगीनाथ काळे यांना तुम्ही आमच्या भांडणात यायचे नाही, तुम्हा सर्वांना आम्ही बघून घेऊ अशी दमदाटी करून रमजान बागवान याच्या कमरेला असलेली पिस्टल बाहेर काढून फिर्यादी यांच्या दिशेने रोखून मारण्याचा प्रयत्न केला आहे, असे फिर्यादीत नमूद आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक दराडे हे करीत आहेत.

## शेतकऱ्याचा मोबाईल चोरून युपीआय ॲपद्वारे फसवणूक करणारे दोघे जेरबंद

**सुराज्य/सोलापूर**

मार्केट यार्ड येथे टरबूज विकण्यासाठी आलेल्या शेतकऱ्याच्या खिशातील मोबाईल चोरून त्या मोबाईल मधील युपीआय प व्दारे सोने खरेदी करणाऱ्या दोन तरुणांना जेलरोड पोलिस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने अटक केली आहे.संदीप दशरथ गायकवाड (वय-२२, रा.पंचशील नगर,कमठा नाका), योगेश ऊर्फ छोट्या काल्या राजू सल्ला (वय-२०,रा.रविवार पेठ) असे अटक करण्यात आलेल्या दोघांची नावे आहेत.

शेतकऱ्याच्या खिशातील मोबाईल चोरून नेणाऱ्या संशयित हे यार्ड परिसरात फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे चौकशी केल्यानंतर आरोपींनी त्यांचा साथीदार बसण्णा ऊर्फ अण्णा सत्तु शिंदे याच्या सांगण्यावरून मोबाईल चोरल्याचे कबूल केले.त्याने त्या मोबाईल मधील युपीआयव्दारे सराफ कट्टा येथून सोन्याची आंगठी,सोन्याची चैन व सोन्याचे बदाम आदी ऐवज खरेदी केले.तसेच एका ग्राहक सेवा केंद्रातून दहा हजार रूपये रोख स्वरूपात घेतल्याचे त्यांनी कबूल केले. दरम्यान वरील दोन्ही आरोपींना पोलिसांनी अटक केली. ही कारवाई पोलिस निरीक्षक मोगल जाफर, पोलिस निरीक्षक बिराजदार यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अल्फाज शेख, अवचारे, शेख, धुमाळ, दुधाळे, बागलकोटे, देकाणे, वायदंडे, गंगावणे, यसलवाड, सिनारे, चमके यांनी केली.

## महाराष्ट्र भूषण परस्कार सोहळ्यास आलेल्या ८ जणांचा उष्माघाताने मृत्यू

**सुराज्य/मुंबई**

नवी मुंबईत महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्यात सहभागी झालेल्या ८ जणांचा उष्माघाताने मृत्यू झाल्याची माहिती राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. या घटनेत मृत्यू झालेल्या नागरिकांच्या कुटुंबियांना शासनाकडून ५ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच, जे उपचार घेत आहेत, त्यांचा संपूर्ण खर्च शासन करणार आहे’, असेही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्यातील ज्या श्रीसेवकांना उष्माघाताचा त्रास झाला आहे. त्यांची मी विचारपूस केली. डॉक्टरांनाही सुचना दिलेल्या आहेत. या रुग्णांना योग्य उपचार देण्याचा सुचना दिला. ही दुर्दैवी घटना आहे. मनाला वेदना देणारी घटना आहे, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

### शासनाकडून ५ लाख रुपयांची आर्थिक मदत

या घटनेत उपचारादरम्यान, ज्या नागरिकांचा मृत्यू झाला आहे. मृत नागरिकांच्या कुटुंबियांना शासनाकडून ५ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच, जे उपचार घेत आहेत, त्यांचा संपूर्ण खर्च शासन करणार आहे, असेही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

### सात ते आठ जणांचा मृत्यू

डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार या घटनेत जवळपास सात ते आठ जणांचा मृत्यू झाला आहे. ही घटना अतिशय दुर्दैवी आहे. लाखो लोकांचा या पुरस्कार सोहळ्यात जनसमुदाय आला होता. त्यांचा उपस्थित हा कार्यक्रम सुरळीत पार पडला. परंतु, शेवटी ही घटना घडली.

## लग्नाचे आमिष दाखवून महिलेवर अत्याचार

**सुराज्य/सोलापूर**

लग्नाचे आमिष दाखवत तीस वर्षीय महिलेवर अत्याचार करत लग्नास नकार दिल्याप्रकरणी नंदेश्वरच्या तरुणावर गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत पीडितेने फिर्याद दिली असून या फिर्यादीवरून उमेश बापू खडतरे (रा.मंगळवेढा) याच्यावर एमआयडीसी पोलीस ठाण्यात अत्याचाराचा गुन्हा दाखल झाला आहे.

पींडित महिलेची आरोपी उमेश खडतरे यांच्यासोबत काही दिवसापूर्वी ओळख झाली होती.त्याने पीडितेशी जवळीकता साधत ओळख वाढवली.त्यानंतर त्याने पीडितेला लग्नाचे आमिष दाखवत तिच्यावर अत्याचार केला. ही बाब पीडितेच्या आणि आरोपीच्या कुटुंबीयांना कळल्यानंतर त्यांनी दोघांना घरातून हाकलून दिले.

दरम्यान, आरोपीने पीडितेला जोपर्यंत माझे आई-वडील लग्नाला होकार देत नाहीत तोपर्यंत मी तुझ्याशी लग्न करणार नाही. तुला काय करायचं ते कर असे म्हणून निघून गेला.याप्रकरणी पीडितेच्या फिर्यादीवरून आरोपी उमेश खडतरे याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा तपास पोसई वळसंगे करत आहेत.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



एका माळेचे मनी !!!

## सोलापूरची ‘ज्योती‘ शिंदे गटाला देणार ‘प्रकाश‘

**सोलापूर/दीपक शेळके**

**महापुरूषांवर प्रबोधनाचे व्याख्यान देऊन सोलापुरात क्रांतीचा जागर करणाऱ्या प्रा. ज्योती वाघमारे ह्या आता राजकीय क्षेत्रात पुन्हा सक्रीय होणार असून राजकीय व्यासपीठावर रणशिंग फुंकणार आहेत. त्यासाठी त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटाशी जवळीक केली आहे. शिंदे गटाकडून त्यांची राज्य प्रवक्तेपदी नियुक्ती करण्यात आली आहे. राज्याच्या राजकारणात ठाकरे-शिंदे गटांमध्ये द्वंद्व असताना शिंदे गटाला आपली भूमिका नेटाने मांडण्यासाठी अभ्यासू प्रवक्त्यांची गरज आहे. ही गरज भरून काढण्याची जबाबदारी प्रा. ज्योती वाघमारे यांच्या खांद्यावर दिली गेली आहे. त्यामुळे सोलापूरची ‘ज्योती‘ आता शिंदे गटाला ‘प्रकाश ‘ देण्याचे काम करणार असल्याने सोलापूरचा आवाज राज्यभर घुमणार आहे.**

प्रा. डॉ. ज्योती वाघमारे यांची वाटचाल दलित चळवळीतून झाली. आहे. वक्तृत्व आणि भाषण कौशल्याच्या जोरावर त्यांनी सोलापूरची अनेक व्यासपीठे गाजवली आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले, स्वावित्रीबाई फुले या महापुरूषांच्या विचाराचा पगडा त्यांच्यावर आहे. या महापुरूषांवर प्रबोधनाचे व्याख्यान देऊन सोलापुरात क्रांतीचा जागर प्रा. ज्योती वाघमारे सुरू ठेवला आहे. आता त्यांची राजकारणात पुन्हा एन्ट्री झाली आहे. माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेमध्ये राजकीय वणवा पेटला आहे. आरोप- प्रत्यारोपाच्या फैरी झडत आहे. उध्दव ठाकरे गटाकडून प्रा. सुषमा आंधारे यांना मैदानात उतरवत शिंदे गटाला सळो कि पळो करून सोडले आहे. प्रा. अंधारे यांचे राज्यातील दौरे गाजले आहेत.

शिवसेनेमध्ये बंडाळी करून शिंदे गटात घरोबा केलेल्या आमदारांच्या मतदार संघात जावून अंधारे ह्या शिंदे गटाचा समाचार घेत आहेत. त्यामुळे जशास तसे उत्तर देण्यासाठी शिंदे गटाला आपली भूमिका अभ्यासू आणि नेटाने मांडणाऱ्या प्रवक्त्यांची गरज होती. ही गरज भरून काढण्याची जबाबदारी प्रा. ज्योती वाघमारे यांच्या खांद्यावर आली आहे. गेली दोन दिवस झाले प्रा. ज्योती वाघमारे मुंबईत ठाण मारून आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट झाली. राज्यातील दौऱ्यांचा अजेंडा ठरला आहे. राज्य प्रवक्ते पदाच्या नियुक्तीचे पत्र सोमवारी दिले जाणार आहे. त्यानंतर आगामी विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन प्रा. ज्योती वाघमारे यांचे राज्यव्यापी दौरे घेऊन शिंदे गटाची भूमिका मांडणार आहेत. प्रा. वाघमारे यांना राजकारणाची जाण आहे. त्या उच्चशिक्षित आहेत. हजरजबाबीपणा मार्मिककता त्यांच्या संभाषण कौशल्यामध्ये असल्याने शिंदे गटाचे विचार राज्यभर पोहचवत शिंदे गटाला प्रकाश देण्याचे काम आता सोलापूरच्या प्रा. ज्योती वाघमारे करणार आहेत. वाघमारे यांना राजकिय कारर्किद फार मोठी नाही दीड वर्ष काँग्रेसच्या महिला आघाडीच्या अध्यक्षपदाची धुरा त्यांनी सांभाळली होती. मात्र त्यानंतर अध्यक्षपदाचा राजीनामा देऊन गेली आठ वर्षे झाली. राजकिय प्रवाहातून दूर गेल्या होत्या मात्र आता थेट राज्याच्या राजकारणात व्यासपीठ मिळाल्याने आपले राजकिय अस्तित्व निर्माण करण्याची मोठी संधी प्रा. वाघमारे यांना मिळली आहे.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट झाली आहे. दौऱ्यांचा अजेंडा ठरला आहे. गृहमंत्री अमित शहा मुंबई दौऱ्यावर आले असल्याने नियुक्तीचे पत्र अद्याप मिळाले नाही. नियुक्तीचे पत्र आज सोमवारी मिळणार आहे. त्यानंतर राज्यव्यापी दौऱ्यांचे नियोजन आहे.

**–ज्योती वाघमारे (राज्यप्रवक्ते शिवसेना शिंदे गट)**

# प्रयागराजचे क्रौर्य

यूपींचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या राज्यातून अलिकडे काही चांगल्या गोष्टी कानावर पडायला लागल्या होत्या. गुन्हेगारी संपवण्याबरोबरच सरकारी जागांवर गुंड-पुंडांनी केलेले अतिक्रमण काढून राष्ट्रीय संपत्तीची त्यांच्या जोखडातून मुक्त केल्याची ही वार्ता सर्वसामान्यांच्या कानाला गोड वाटणारी नक्कीच आहे.आरोग्याच्या बाबतीतही योगींनी मोठे पाऊल टाकून बालकांना मेंदूज्वरसारख्या आजारातून सुटका केली.पण प्रयागराजमधील एका क्रौर्याने त्यांच्या या कामगिरीला गालबोल लागले,याचे दुःख वाटते.घरात परंपरागत चालत आलेल्या अतिक अहमद व त्याचा भाऊ अशरफ अहमद या दोघांची प्रयागराजमध्ये रात्री गोळ्या घालून हत्या केली गेली. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे पोलिसांच्या देखत त्या दोघांचा खात्मा करण्यात आला.पोलीस शांतपणे उभे होते आणि मारेकरीही.मारेकऱ्यांनी जय श्रीरामच्या घोषणा दिल्यामुळे ते कोण होते? हे वेगळे सांगण्याची गरज नाही.मीडियाचे प्रतिनिधी म्हणून गळ्या बिल्ला घालून ते आले होते.त्यामुळे हा प्रकार मीडियासाठी चिंतेचा ठरू शकतो. एका गुन्हेगारी विश्वाचा नायनाट केला गेला,अशी प्रतिक्रिया हिंदुत्ववादी नेत्यांमधून उमटत आहे तर आता तर पाप-पुण्याची भाषा सुरू झालीय.योगींच्या मंत्रिमंडळातील एका मंत्र्याने पापाचा घडा भरला होता,अशी संतप्त प्रतिक्रिया दिली आहे.त्या दोघांच्या हत्येचा माजी मुख्यमंत्री अखिलेश यादव यांनी निषेध केला असून योगी यांना मध्यरात्रीतून चौकशीची पावले टाकावी लागली.यूपीत कुप्रसिद्ध व्यक्तिमत्त्व, माफिया आणि राजकारणी म्हणून अतिक अहमद आणि त्याचा भाऊ अशरफ अहमद यांच्याकडे पाहिले जायचे.विविध पोलीस ठाण्यांमध्ये त्यांच्यावर किती गुन्हे दाखल होते,याची संख्या मोजता येणारच नाही.माजी मुख्यमंत्री मायावतींवरही अतिकने गोळीबार केला होता म्हणे.बघा त्याचीही डेरिंग. अतिक अहमदचे आयुष्य हे एखाद्या हिंदी वेबसिरीज किंवा गँग्ज ऑफ वासेपूर सारख्या चित्रपटाच्या कथानकाला शोभेल असे राहिले. एक सामान्य तरुण गुन्हेगारी आयुष्यात पाऊल ठेवतो, तिथून तो



राजकारणी बनतो. फिल्मी स्टाईलने लोकांना संपवतो, व्यापाऱ्यांची संपत्ती ताब्यात घेतो आणि त्याचा अंतही एखाद्या चित्रपटाच्या सीनसारखा होतो. उत्तर प्रदेशमध्ये राजकारणाचे गुन्हेगारीकरण इतक्या थराला पोहोचले होते की, अतिक अहमदने भारताचे माजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या मतदारसंघातून विजय मिळवला होता. अतिक अहमदला मात्र सुरुवातीपासून शंका होती की, त्याच्यासोबत काहीतरी विचित्र घटना घडेल. म्हणूनच तो गुजरातच्या तुरुंगातून यूपीमध्ये जाण्यास तयार नव्हता. त्यासाठी त्याने सर्वोच्च न्यायालयापर्यंत धाव घेतली. योगी सरकारमधील एका मंत्र्याने 'गाडी तो कभी भी पलट सकती है' अशा आशयाचे विधान १ मार्च रोजी केले होते. त्यावरूनच अतिकचा एन्काऊंटर होणार याची चुणूक अनेकांना लागलेली होती. कृषी संस्थेच्या एका प्राध्यापकावर हल्ला केल्याप्रकरणी २०१६ रोजी त्याला अटक करण्यात आली होती. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार त्याला २०१९ मध्ये गुजरातमधील तुरुंगात हलविण्यात आले. उत्तर प्रदेश पोलिसांना अतिकची कोठडी हवी होती, यासाठी हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पोहोचले. अतिकच्या सुरक्षेची हमी घेतल्यानंतर गुजरातहून त्याची रवानगी उत्तर प्रदेशमध्ये झाली.अतिक अहमदवर प्रयागराज येथे खुनाचा प्रयत्न केल्याबद्दल १९८४ रोजी पहिला गुन्हा दाखल झाल्याची नोंद आहे. पाच वर्षांनंतर १९८९ रोजी अहमदने पहिल्यांदा तेव्हाच्या अलाहाबाद पश्चिम विधानसभा मतदारसंघातून अपक्ष म्हणून निवडणूक लढवली आणि विजयदेखील मिळवला. पुढच्या दोन विधानसभा निवडणुकीत अपक्ष लढून अहमदने ही जागा कायम ठेवली. त्यानंतर समाजवादी पार्टीने अहमदसाठी आपले दरवाजे खुले केले. तब्बल तीन दशके अतिक अहमदचे गुन्हेगारी कृत्य आणि राजकारण समांतररित्या सुरू होते. आजवर त्याच्यावर १०० च्या आसपास खटले दाखल झालेले आहेत. त्याच्या टोळीत १४४ गुंड होते. तरीही एका पक्षातून दुसऱ्या पक्षात उड्या मारत निवडणूक जिंकण्याचा प्रताप अतिकने करून दाखविला. हा घटनाक्रम पाहाता तो कुणाच्या जिवावर मोठा झाला हे लक्षात येते. आता योगींची सत्ता असल्याने त्यांच्यावर टीका होणे स्वाभाविक आहे. झालेला प्रकार घटनात्मकदृष्ट्या योग्य नाहीच. त्याच्या शिक्षेचा फैसला न्यायालयातच व्हायला हवा होता.पोलिसांपुढेच कुणाची तरी हत्या होत असेल तर आता सर्वसामान्यांचे सार्वजनिक ठिकाणी काय होईल? ही प्रयागराजच्या घटनेमधून निर्माण झालेली भीती अनाठायी म्हणताच येणार नाही.

वर्ल्ड डे निमित्त

# हिमोफिलिया बांधितांचे भवितव्य काय?

या आजाराला श्रीमंत रोग (रॉयल डिसेस) संबोधले जाते. हा रशियन राजघराण्यातील प्रसंग आहे. तो स्वतंत्र विषय ठरेल पण आपण आता मूळ आपल्या भारतातील या समस्येकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे. १४० कोटी लोकसंख्येच्या भारतात २५ लाखांपेक्षा अधिक रुग्ण असल्याची माहिती आहे. सरकारकडे ठोस आकडेवारी उपलब्ध नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने १९९५ च्या अपंग कायद्यात २०१६ मध्ये बरीच सुधारणा केली. दिव्यांग योजना असे या सुधारणेला नाव दिले. ही सुधारणा करत असताना रक्तविकारातील आजारांचा समावेश दिव्यांगमध्ये समाविष्ट केला.

**रविवारच्या लेखात हिमोफिलियाविषयीची माहिती आपण जाणून घेतली. ती त्रोटक होती. त्यावर विपुल लिखाण करता येईल. हा हिमोफिलिया अख्ख्या जगाला छळतो आहे. युरोप खंडात या रुग्णांची संख्या अधिक असल्याचे विविध अहवालावरून स्पष्ट होते. या रक्तविकारातील आजारावर संशोधन करायला हवे. औषधांची निर्मिती करायला हवी. सुधारित औषधांचा प्रसार करायला हवा तसेच या विकारातील लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी कॅनडाचे सुपुत्र फ्रँक श्नबेल यांनी १९६९ मध्ये वर्ल्ड हिमोफिलिया फेडरेशनची स्थापना केली, ज्याचे मुख्य कार्यालय कॅनडाच्या क्युबेकमधील मॉन्ट्रियलमध्ये आहे. जगातील १४७ देश या फेडरेशनचे सदस्य आहेत. त्यात भारताचाही समावेश आहे. जागतिक आरोग्य संघटनेची (डब्लूएचओ) या फेडरेशनला मान्यता आहे. ही संस्था जगातील आकडेवारी गोळा करते आहे पण त्याला प्रतिसाद मिळत नाहीय. जगातील ७५ टक्के लोकांना आजही हिमोफिलिया म्हणजे काय? हे माहीत नाही, असा याच संस्थेचा अनुमान आहे. ही संस्था स्थापन करून श्नबेल यांनी मोठी क्रांती घडवली.१७ एप्रिल हा त्यांचा वाढदिवस. म्हणून या दिवशी १९८९ पासून जागतिक हिमोफिलिया दिन साजरा करण्याची प्रथा पडली. यंदाच्या या दिनाची थीम आहे, 'सर्वांसाठी प्रवेश: काळजीचे जागतिक मानक' म्हणून रक्तस्राव प्रतिबंध, अशी आहे.**

सरकारचा हेतू चांगला आहे पण सरकारी बाबूंनी त्यात मेखा मारून ठेवल्या. त्यामुळे हिमोफिलियातील बी व सी कॅटेगिरीतील रुग्णांना अपंगत्व असूनही सरकारी योजनांचा लाभ मिळत नाही. लहानपणापासूनच्या जॉईंट ब्लिडिंगमुळे सांध्यातील हाडे ठिसूळ होतात. पुढे पुढे म्हणजे वय वाढत जाईल, त्यानुसार चालताना सांध्यांमध्ये त्रास होतो. घोटे, गुडघे व हाताचे कोपरे काम देत नाहीत. हेच खरे अपंगत्व आहे. पण केंद्र सरकारने रक्तातील घटकाच्या (फॅक्टर रेंज) प्रमाणावरून अपंगत्वाची फूटपट्टी ठरवली आहे. सरकारकडून अपंगत्वाचे प्रमाण ४० टक्के ठरवले गेले आहे पण हिमोफिलियातील बी व सीमधील बहुसंख्य रुग्ण असे आहेत की, रक्तघटकाच्या प्रमाणानुसार त्यांची अपंगत्वाची मर्यादा ३९ टक्क्यांपर्यंतच जाते. केवळ एक टक्क्याचा अभाव पाहून सरकारी लाभ या रुग्णांना मिळत नाहीत. तीनही कॅटेगिरीतील रुग्णांना सेम त्रास आहे. बी कॅटेगिरीतील रुग्णांना जॉईंट ब्लिडिंगचा प्रचंड त्रास असतो. वास्तविक पाहाता



हिमोफिलियाच्या रुग्णांना दिव्यांग प्रमाणपत्र देताना अस्थिरोग डॉक्टरांचा (आर्थो) डॉक्टरांचा सहभाग आवश्यक आहे. कारण शारीरिक अपंगत्वाचे प्रमाण तेच सांगू शकतात पण आमच्या केंद्रातील सरकारी बाबूंनी या आजाराचे अधिकार केवळ मेडिसीन विभागाला देऊन टाकले आहेत. सरकारी रुग्णालयात दिव्यांग प्रमाणपत्र प्रक्रियेत आर्थो विभागाचा अभिप्राय महत्त्वाचा आहे. पण सरकारकडून तसे अधिकार नाहीत. मेडिसीन विभाग सरकारच्या जीआरनुसर दिव्यांग प्रमाणपत्र देताहेत. २०१६च्या अपंग कायद्यात सुधारणा करताना समानता हा निकष सांगितला आहे तेव्हा इथे कुठे आहे समानता? सर्वांना समान न्याय आहे कुठे? सरकारचे लक्ष या प्रश्नाकडे वेधण्याची गरज आहे.

हिमोफिलिया रुग्णांसाठी ४० टक्क्यांची अटच शिथिल करण्याची गरज आहे. त्याला राजकीय इच्छाशक्ती आवश्यक आहे पण आमच्या सत्ताधाऱ्यांना अशा प्रश्नांकडे लक्ष द्यायला वेळ आहे कुठे? आमच्या खासदार व आमदारांना हा विषयच माहीत नाही. वा तो जाणून घेण्याची तसदीही ते घेत नाहीत. महाराष्ट्रात दिव्यांगांचे प्रश्न हाताळणाऱ्या अनेक संघटना आहेत. त्यात खा. सुप्रिया सुळे आणि प्रहार संघटनेचे आ. बच्चू कडू हे त्यात आघाडीवर आहेत पण त्यांनीही या प्रश्नात लक्ष घातल्याचे दिसत नाही. राज्यात दिव्यांगांसाठी मंत्रालय झाले पण सरकारी लाभ मिळत नसतील तर हे मंत्रालय घेऊन करायचे तरी काय? हिमोफिलियातील अनेक मुले शिक्षण घेत आहेत. तरुण-तरुणी महाविद्यालयीन शिक्षण घेऊन आपल्या आयुष्याची भाकरी शोधत आहेत. पण दिव्यांगांचे प्रमाण ४० च्या खाली असणाऱ्या वर्गाला सरकारी लाभापासून वंचित राहावे लागत आहे. पुढे नोकरी कशी मिळणार? शिष्यवृत्ती कशी मिळणार? एखाद्या मुलाला परीक्षेत लेखनिक कसा मिळणार? गरीब वर्गातील रुग्णांना ये-जा करण्यासाठी तीन चाकी सायकली कशा मिळणार? आत्ताच्या पिढीची अवस्था मग पुढे येणाऱ्या अशी पिढीची काय हाल होतील, याचा विचार आताच करण्याची गरज आहे.एक सोलापूरचेच उदाहरण देतो. विडी घरकूलमधील एका महिलेला हिमोफिलिया आहे. तिच्यासह तिचे वडील व भाऊ यांनाही तो होता. वडील-भाऊ नाहीत. लहान बहीण खाजगी नोकरी करून तिला व आईला सांभाळते. 'ना घर, ना दार' अशा या कुटुंबाची सध्या काय हालत आहे हे देवच जाणे. लॉकडॉऊनच्या काळात अशा गरीब कुटुंबांचा विचार केला गेला नाही. कष्ट करायला हात आणि पाय घट्ट लागतात. तेच धड नसतील तर या रूग्णांचे भवितव्य काय? याचा विचार सत्ताधारी, लोकप्रतिनिधी व एनजीओंना करावा लागणार आहे.

**- पुरुषोत्तम कुलकर्णी, सोलापूर.**

टुडेज् ब्लॉग

# पाणी वाचवायला हवे

**आपण सुरुवातीपासूनच पाणी साठवत आलो आहोत. परंतु आधुनिक जीवनशैलीने नैसर्गिक स्रोतांच्या संवर्धनाची जबाबदारी केवळ काही स्वयंसेवी संस्था आणि सरकारांपर्यंतच मर्यादित करून टाकली आहे. पाणी, हवा, जमीन किंवा इतर नैसर्गिक संसाधनांनाही मर्यादा असतात आणि ते कायम टिकणारे नाहीत, हे माहीत असूनही त्याची आपल्याला अजिबात चिंता वाटत नाही वास्तविक आपल्याला जर काही शिकून घ्यायचं असेल तर आपण आपल्या इतिहासात डोकावून पाहायला हवं. आदी युगात आपल्याकडे पुरेसे पाणी होतं, तरीही त्या काळात जलसंधारणाची पुरेशी व्यवस्था केली गेली होती आणि त्याच पद्धतींमध्ये थोडा बदल करून आज आपण पाण्याच्या समस्येपासून मोठ्या प्रमाणात मुक्त होऊ शकतो. जलसंधारणाच्याबाबतीत भारताला एक उत्कृष्ट इतिहास आहे. येथे जल संवर्धनाची एक मौल्यवान पारंपारिक, सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरा आहे, जी केवळ ओळखली जाण्याचीच नाही, तर ती आपण अंगीकारलीही जाण्याची आहे.**

वैदिक कालखंडात पाण्याची साठवण नैसर्गिक आणि कृत्रिम अशा दोन्ही प्रकारे केली गेली. सध्याची परिस्थिती पाहिली तर पाण्याचे व्यवस्थापन हे देशाच्या अर्थव्यवस्थेशी आणि सामाजिक व्यवस्थेशी निगडित आहे. यावर कृषी, औद्योगिक आणि तांत्रिक प्रगती अवलंबून आहे. भारतातील भूजल जलविज्ञानाचा विकास पाच हजार वर्षांहून अधिक जुना आहे. वैदिक साहित्यात याचा पुरावा आहे. त्यामध्ये इंद्र, वायू, अग्नी इत्यादी विविध देवतांची श्लोक, सूत्र आणि स्तुती म्हणून पूजा केली जाते. प्राचीन भारतीय संस्कृतीत 'पाणी म्हणजे जीवन आहे' हे सिद्धांत मांडले गेले आहेत. वैदिक साहित्यात वारंवार पाण्याचे स्रोत, पाण्याचे महत्त्व, तिची गुणवत्ता आणि संवर्धनाविषयी वारंवार चर्चा केली गेली आहे. वैदिक कालखंडात पाण्याचे व्यवस्थापन मोठ्या आणि अत्यंत चांगल्या पद्धतीने केले जात असे. चरक संहितामध्ये भूगर्भातील पाण्याच्या गुणवत्तेचीही चर्चा आहे. बृहत संहितेच्या चौपन्नाव्या अध्यायात



झाडे, प्राणी, जमीन आणि खडकांशी संबंधित विशेष संकेतक व विहिरी खोदण्याच्या पद्धतींचे वर्णन आहे, ज्यामुळे जमिनीखाली पाणी प्रकट होते. निसर्गात अशी काही झाडे आहेत, जी जमिनीखाली पाणी असल्याबाबत माहिती देतात. आजचे पर्यावरणीय विज्ञान आणि वराहमिहीरचे पारंपारिक विज्ञान यांच्यातही एक संबंध आहे. निसर्गाने पृथ्वीवर एकाहत्तर टक्के पाण्याची व्यवस्था केली आहे. एवढेच नाही तर आपल्या शरीराचा सदुसष्ट टक्के भाग पाण्याने व्यापला आहे.

पाणी ही जीवनासाठी सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. पण आज त्याचे स्रोत कमी होत आहेत. आज जगाला सुरक्षित आणि ताज्या पाण्याच्या स्रोतांची गरज आहे. पिण्याचे पाणी आणि स्वच्छता, सुविधा, आरोग्याचे रक्षण या गोष्टी मूलभूत गरजांपैकी एक आहेत. त्यामुळे पाणीपुरवठा आणि स्वच्छता हे सर्व लोकांच्या आरोग्यासाठी आणि विकासाच्या समस्यांसाठी राष्ट्रीय आव्हान बनले आहे.

भूगर्भातील पाण्याच्या अतिवापरामुळे पारंपारिक पाण्याचे स्रोत कोरडे होत आहेत. पृथ्वीवर उपलब्ध असलेल्या एकूण पाण्यापैकी ९७.५ टक्के पाणी समुद्री आहे. हे समुद्री पाणी खारट असल्याने आमच्यासाठी निरुपयोगी आहे. उर्वरित अडीच टक्के पाणी गोड आहे. परंतु त्यातील चोवीस दशलक्ष घन किलोमीटर भूगर्भातील पाणी सहाशे मीटर खोलीवर अस्तित्वात आहे आणि सुमारे पाच लाख घन किलोमीटर पाणी अशुद्ध आणि प्रदूषित झाले आहे. म्हणजेच पृथ्वीवर असणाऱ्या एकूण पाण्यापैकी केवळ एक टक्का पाणी उपयुक्त आहे. जगातील आठ अब्ज लोकसंख्येसह सर्व प्राणी आणि वनस्पती जगताला या एक टक्का पाण्यावर अवलंबून राहावे लागत आहेत. सिंचन, शेती आणि सर्व उद्योग या गोष्टी गोड्या पाण्यावर चालतात. साहजिकच, आगामी काळात पाण्याचे संकट अधिक गंभीर रूप धारण करणार आहे. यामुळे देशात अन्न-धान्याचे संकट निर्माण होईल, उद्योग संपतील, स्थलांतर, बेरोजगारी वाढेल व परस्पर संघर्षांना चालना मिळेल आणि देशाच्या अर्थव्यवस्थेचे मोठे नुकसान होईल. भारतात जगातील एकूण गोड्या पाण्यांपैकी अडीच टक्के पाणी उपलब्ध आहे, त्यातील एकोणनव्वद टक्के पाणी शेतीसाठी वापरले जाते.

भारत पाण्याचा जागतिक स्रोतांचा सर्वात मोठा ग्राहक आहे. संपूर्ण जगात भारतात पाण्याचा सर्वाधिक वापर करण्याचे प्रमाण तेरा टक्के आहे. भारतानंतर चीन बारा टक्के आणि अमेरिका नऊ टक्के वापरतो. एका अहवालानुसार, २०५० पर्यंत अनेक भारतीय नद्यांना पाणी संकटाचा सामना करावा लागणार आहे. दरवर्षी पाऊस आणि बर्फातून वाहणाऱ्या नद्यांमधून भारताला सरासरी चार हजार अब्ज घनमीटर पाणी मिळते. भारतात साडेचार हजाराहून अधिक धरणे असून यांची साठवण क्षमता दोनशे वीस अब्ज घनमीटर आहे. यात लहान सहान जलस्रोतांचा समावेश नाही. ज्यांची क्षमता ८१० अब्ज घनमीटर इतकी आहे. तरीही आमची दरडोई साठवण क्षमता ऑस्ट्रेलिया, चीन, मोरोक्को, दक्षिण आफ्रिका, स्पेन आणि अमेरिकेपेक्षा खूपच कमी आहे. तसेच प्राणी जगतासाठीही पाणी आवश्यक आहे. म्हणूनच, नैसर्गिक स्रोत नष्ट होऊ नयेत, म्हणून काळजी घेतली पाहिजे. पर्वत,जलस्रोत आणि वने यांना एकाच सूत्रात बांधले जाणे फार महत्त्वाचे आहे. त्यातूनच जलसंधारण शक्य आहे. म्हणूनच जंगले आणि नद्या वाचविणे आवश्यक आहे, कारण या दोन्हींमुळेच पिण्याचे पाणी आणि पुरेसे शुद्ध वातावरण उपलब्ध होणार आहे.

**- मच्छिंद्र ऐनापुरे, जि. सांगली.**

जन्म हा अखेरचा

## कायानुग्रहस्थल - ३



शिव हा चित्सागर आणि सुखसागर आहे. चित् म्हणजे ज्ञान. शिव ज्ञानसागर आहे, सर्वज्ञ आहे. भगवान शिवापासूनच सर्व विद्या उत्पन्न झाल्या. समुद्रात अथांग पाणी असते त्याप्रमाणे शिवाचे ज्ञान अगाध असते. समुद्रातले पाणी कधी कमी होत नाही की अधिक. ईश्वराला सागराची उपमा दिलेली आहे. संसाराला देखील सागराची उपमा दिली जाते.

ईश्वर हा ज्ञानाचा व सुखाचा सागर आहे तर संसार हा अज्ञानाचा व दुःखाचा सागर आहे. प्रत्येक मनुष्याला ज्ञान आणि सुख हवे असते. अज्ञान आणि दुःख कोणालाही नको असते. सर्वांना सुखी आणि ज्ञानी व्हायचे असते. परंतु प्रपंचसंमुख होऊन ज्ञानाची आणि सुखाची प्राप्ती होणे शक्य नाही. ज्याच्या समोर तुम्ही बसता, त्याचा प्रभाव तुमच्यावर पडतो. प्रपंचसंमुख झाल्यावर अज्ञान आणि दुःखच मिळणार आणि ईश्वरसंमुख झाल्यावर ज्ञानाचा आणि सुखाचा लाभ होणार.

शिवयोगी चित्सागर आणि सुखसागर अशा शिवात आपले मन विलीन करतो. तो आपल्या चित्ताच्याद्वारे शिवाशी संबंध जोडतो. त्यामुळे त्याला शिवाचे गुण प्राप्त होतात. सोलापूर शहराला हिप्परगा तलावातून आणि भीमा नदीतून पाणीपुरवठा केला जातो. घरात बसून तुम्ही नळाची तोटी फिरवता. भीमेचे पाणी पडू लागते. नदी खूप दूर आहे. परंतु मोठमोठ्या पाईपांद्वारे नदीशी संबंध जोडून तिचे पाणी घराघरांत पोहोचवले जाते. पाईपलाईनने नदीशी संबंध जोडलेला आहे. असा संबंध नसेल तर तुमच्या घरात पाणी कसे येईल? त्याप्रमाणे आपले चित्त जेव्हा भगवान शिवाशी जोडले जाते तेव्हा त्याचे गुण आपल्या ठिकाणी उतरतात. भगवंताची पूजा करावी, त्याचा नामजप करावा, त्याचे ध्यान करावे हे सारे याचसाठी सांगितले जाते. त्याचे नामस्मरण केल्याने, त्याच्या मूर्तीला स्पर्श करुन पूजा केल्याने आणि त्याच्या निर्गुण-निराकार रुपाचे ध्यान केल्याने त्याच्याशी आपला संबंध जोडला जातो. असा संबंध जोडणे यालाच 'योग' म्हणतात. मनाने, वाणीने आणि शरीराने शिवाशी संबंध जोडला पाहिजे.

**(क्रमशः) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

जनमानस

## महाराष्ट्र संपूर्ण साक्षर होईल काय?

केंद्र सरकारने अमृत्कालानिमित्त देशाने साधलेल्या सामाजिक प्रगतीचा आढावा घेतला असता प्रत्येक राज्यातील साक्षरतेच्या प्रमाणाचा अंदाज घेतला. त्यात देशभरात १४ कोटी नागरिक निरक्षर असल्याचे समोर आले. अंदाजे ८४ टक्के जनता साक्षर असल्याचे मानले जात असणाऱ्या १२.०८ कोटी लोकसंख्येच्या महाराष्ट्रात जवळपास १.७५ कोटी लोकसंख्या निरक्षर आहे असे निदर्शनास आले.



एकीकडे १३ कोटी मोबाईल्स आहेत ही राज्याच्या प्रगतीचा आलेख दर्शवणारी आकडेवारी उपलब्ध आहे. दुसरीकडे मात्र कोरोनामुळे २०२१ मधील जनगणना पूर्ण होऊ शकली नाही. राज्याच्या निरक्षरतेच्या स्त्रोतासंबंधी माहिती केंद्राकडून येणे आहे. नंदुरबार, गडचिरोली, परभणी व धुळे जिल्ह्यातील निरक्षरतेचे प्रमाण तपासणीचे काम शिक्षण विभागांच्या सहाय्याने आखले जाणार आहे. पुणे, नागपूर या शहरांसह राज्याची साक्षरता १०० टक्क्यांपर्यंत नेण्याचा राज्य सरकारचा निर्धार आहे. त्यामुळे राज्यातील निरक्षर लोकं हुडकून काढत त्यांना साक्षर करण्याची मोहिम यशस्वीपणे राबवून महाराष्ट्र राज्य देशाच्या अमृत काळात १०० टक्के साक्षर होईल अशी खात्री बाळगायला हरकत नाही.

**- स्नेहा राज, गोरेगाव.**

## सिनेमाचे तिकीट दर कमी करा

आता चित्रपट, मालिका मोबाईलवर ओटीटी प्लॅटफॉर्मवर सहजगत्या उपलब्ध झाल्याने व मल्टिप्लेक्समधील तिकिटदर, महागडे खाद्यपदार्थ परवडणारे नाही. त्यातून चित्रपट संदर्भात होणारे वादविवाद, पाहता परिस्थिती कठीण वाटते. महागाई, बेरोजगारी या गोष्टींनी विपरीत परिणाम केलेला आहे. तिकिटदर कमी झाले तर प्रेक्षकवर्ग पुन्हा थिएटरकडे वळू शकतो.

**- प्र. मु. काळे, नाशिक.**



## - संतविचार -

डॉ. देविदास गुरव, सोलापूर

# 'संतसंग मज घडला'



**'भाग्याचा उदय झाला, संतसंग मज घडला ।**
**तेणे आनंदाचे पूर, लोटताती निरंतर ।**
**प्रेम सप्रेम भरते, अंगी उतार चढते ।**
**आली आनंदलहरी, एका जनार्दनी निर्धारी ।।**

संतसंग घडला म्हणून आज सद्भाग्याचा उदय झाला. अंतःकरणात आनंदाचा पूर आला. संतांच्या प्रेमळ सहवासाने सर्वत्र आनंदलहरी निर्माण झाल्या आहेत. त्यांच्या सानिध्यामुळे अंतरंगातल्या विखारी व विषारी वृत्तीला उतार (औषध/उपाय) मिळाला आहे. सत्पुरूषांचा सहवास किती प्रभावी व गुणकारक असतो, हे नाथ माऊली सहजच आपल्यापुढे ठेवतात. अर्थात माउलींचे हे उद्‌गार अनुभवसिद्ध, ब्रह्मज्ञानी, सबाह्य निर्मळ भवताप तारणाऱ्या संताविषयी आहे. अशा सत्पुरुषांचा सहवास घडणे ही मोठी भाग्याची गोष्ट आहे, ते सबाह्य प्रेमळ, ते निरंतर आनंदाचे स्त्रोत आहेत. कारण त्यांच्याच सानिध्यात आल्यानंतर आपल्या सबंध देहात आनंदलहरी प्रवाहित होतात. खऱ्या संतांची परोपकारी वृत्ती, त्यांच्या आचार-विचारातील सत्विकता त्यांचा स्वाभाविक गोडवा सर्वांनाच मंत्रमुग्ध करतो. त्यांची थोरवी पहात क्षणी कळून येते.

परंतु आजकाल कुणालाही 'संत' ही उपाधी दिली जाते. काहीजण तर स्वयंघोषित 'संत' असतात. शिष्यांच्या गोतावळ्यात वावरणारे, रमणारे व भक्तांकडून वेगवगळ्या 'कामना' करणारे 'संत' जागोजागी भेटतील. असे दांभिक प्रत्येक धर्मात भेटतील. अशा ढोंगी-सोंगी लुबाडणाऱ्या व फसवणाऱ्यांना नामदेवादी संतांनी चांगले फटकारले आहे. भक्तिचे अवडंबर माजवणाऱ्या वासना विकारांनी बरबटलेल्या व ज्ञानी असल्याचे आव आणणाऱ्या तथाकथित दांभिकापासून दूर राहण्याचा सल्ला दिला आहे. मग खरा संत ओळखावा कसा? खरा योगी कोण? त्याला जाणून कसे घ्यावे? इ. प्रश्नांचे उत्तर संतांनी वाणीतून वेळोवेळी सांगितले आहे. फक्त गरज आहे ती डोळसपणे पाहण्याची व अंतःकरणाने जाणून घेण्याची. नामदेवांनी तर असे संत जेव्हा जेव्हा भेटतात तेव्हा तेव्हा कशी अनुभूती येते ते अनेक अभंगातून दृष्टांताद्वारे दाखवून दिले आहे.

**'परिसाचे संग लोह होय सुवर्ण**
**तैसा भेटे नारायण संतसंगे ।**
**वनस्पती परिमळु चंदन झाला जाण**
**तैसा भेटे नारायण संतसंगे'**

संत हा 'परिस' असतो. त्याचा परिमळ स्पर्श आपोआपच दरवळत असतो. अशा संतांची भेट घडली की, साक्षात नारायणाच्या भेटीचा अनुभव येतो. खरा संत भगवंताच्या बरोबरीचा असतो. याहीपुढे जाऊन निंदास्तुती सम मानिती, जे संत पूर्ण 'धैर्यवंत साधु ऐसे' जनसामान्यांची फसवणूक होऊ नये म्हणून पहा किती समर्पक उदाहरणे देऊन खऱ्या संतांची लक्षणे नामदेव सांगतात. आज जे भोळेभाबडे भक्त आजच्या 'संतांच्या' नादी लागले आहेत. त्यांच्यात वरील एकतरी गुण आहे का? विचार करण्यासारखी गोष्ट आहे! नाथ माऊलीं काय म्हणतात पहा,

**जळ वरिवर क्षाळी मळ योगिया सबाह्य करी**
**निर्मळ। उदक सुखी करी एकवेळ,**
**योगी सर्वकाळ सुखदाता।।**

योगी पुरूष (संत) अनेक बाबतीत श्रेष्ठ असतात. पाणी हे देहावरील मळ स्वच्छ करतो. परंतु योगीयांच्या सहवासात मनुष्य अंतर्बाह्य निर्मळ होतो. सत्पुरूष हे सर्वांना सर्ववेळ 'सुख' देणारे आहेत अशा आनेक दृष्टांतातून संत सज्जनाचे माहात्म्य स्पष्ट करतात.

**गुरु अमृत है जगत में, बाकी सब विषबेल ।**
**सद्‌गुरू संत अनंत है, प्रभू से कर दे मेल ।।**

'प्रभूशी' मेळ घालून अंधःकाराचे, अज्ञानाचे जो निवारण करणारा तो गुरू योगीराजच असतो. तो केवळ शिकवत नाही तर जगण्याचे भान देतो. प्रपंच आणि परमार्थ यातील अचूक 'रेषा' तो वाचतो. प्रामाणिक जिज्ञासा व गुरूची निर्मळता यांच्या समन्वयातून आत्मज्ञानाचा उदय होतो.

आत्मज्ञानाच्या प्राप्तीसाठी सत्पुरूषांचा सहवास अतिशय मोलाचा असतो हेच संतांनी आपल्या अमृत वाणीतून प्रतिपादन केले आहे. अशाच गुरूंचा, सत्पुरूषांचा, सज्जनांचा सहवास लाभू दे असे मागणे सर्वच संत मंडळींनी ईश्वराकडे केले आहे.

खरा भक्तीचा मार्ग दाखवणाऱ्या, परमार्थ समजावून सांगणाऱ्या अशा संतांची वाणवा आहे. मग शोधायचे कुठे? ती दृष्टी संतसाहित्य, संतविचार नि संतवाणीतून मिळते. निरंतर त्यांच्या सानिध्यात नि सेवेत राहणे म्हणजेच संतसंग होय. हेच वरील प्रश्नाचे उत्तर होय.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# लोकशाही टिकविण्यासाठी सत्याग्रह आंदोलन : डॉ. धवलसिंह



✔ सुराज्य/दक्षिण सोलापूर

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशात हुकूमशाही चालवली आहे. बँकेला आणि जनतेला फसवणाऱ्या उद्योगपतींना साथ देण्याचे पाप भाजप करीत आहे. सत्ताधाऱ्यांनी देशात मनमानी कारभार सुरू केला आहे. देशातील लोकशाही नाहीशी करून हुकूमशाही प्रस्थापित करण्याचा त्यांचा प्रयत्न सुरू आहे. हा डाव हाणून पाडण्यासाठी काँग्रेसचे राष्ट्रीय नेते राहुल गांधी हे प्रयत्न करीत असल्याने त्यांचा आवाज दावण्यासाठी त्यांची खासदारकी रद्द केली आहे. येणाऱ्या काळात भाजपला सत्तेवरून खाली खेचून देशात लोकशाही टिकविण्यासाठी सत्याग्रह आंदोलन करण्यात येत असल्याचे काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. धवलसिंह प्रतापसिंह मोहिते-पाटील यांनी सांगितले.**

राहुल गांधी यांची खासदारकी रद्द केल्याच्या निषेधार्थ शनिवारी मंद्रूपच्या अपर तहसीलदार कार्यालयासमोर जय भारत सत्याग्रह आंदोलन करण्यात आले.

याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ते काकासाहेब कुलकर्णी, सोलापूर बाजार समितीचे संचालक बाळासाहेब शेळके व वसंत पाटील, जिल्ह्याचे वरिष्ठ उपाध्यक्ष विजयकुमार हत्तुरे, सुरेश हसापुरे, दक्षिण सोलापूर काँग्रेसचे अध्यक्ष हरीश पाटील, माजी सभापती अप्पाराव कोरे, भीमाशंकर जमादार, अशोक देवकते, ओवीसी सेलचे प्रदेश उपाध्यक्ष सुधीर लांडे, राधाकृष्ण पाटील, भीमराव वाळगी, मल्लेशी विडवे, रमेश हसापुरे, अनंत म्हेत्रे, महेश जोकारे, रेवणसिद्ध मेंडगुदले, पंडित सातपुते, मोतीलाल राठोड, मोतीराम चव्हाण, महिला तालुकाध्यक्षा अरूणा बेंजरपे, महेश माने, संगमेश बगले, रशीद शेख, प्रा. उमाशंकर रावत, महम्मद शेख उपस्थित होते. यावेळी मोहिते-पाटील म्हणाले, मोदी हे सरकारी भांडवलदारांच्या हातात देश देत आहेत.

काँग्रेसचे राष्ट्रीय नेते राहुल गांधी यांनी मोदी आणि भाजपच्या कारनाम्याचा पोलखोल केल्यामुळे भाजपच्या पायाखालची वाळू घसरली आहे. गांधी हे महागाई, अन्याय, अत्याचाराच्या विरोधात आवाज उठवित आहेत. देशाला अखंड ठेवण्यासाठी त्यांनी भारत जोडो यात्रा काढली. या यात्रेला जनतेचा मोठा प्रतिसाद मिळाला. जर गांधी संसदेत खासदार म्हणून राहिले तर आणखी पोलखोल होईल याची भीती भाजपला वाटल्याने भाजपने त्यांची खासदारकी रद्द केली आहे.

एकीकडे नीरव मोदी, ललित मोदी, विजय मल्ल्या यासारखे लोक बँकांना टोप्या घालून पळून गेले आहेत. त्यांच्यावर सरकारने कारवाई केली नाही. सर्वसामान्यांचा आवाज बुलंद करणाऱ्या गांधी यांच्या विरोधात भाजपने सूडबुद्धीने कारवाई केली आहे. चोरांना चोर म्हणणे चूक आहे का? असा सवालही त्यांनी केला. यावेळी कुलकर्णी, शेळके, हत्तुरे, डॉ. शिवानंद झळके आदींची भाषणे झाली. सूत्रसंचालन सिद्धू खरात यांनी करून आभार मानले.

मंद्रूप : राहुल गांधी यांची रद्द केलेली खासदारकी मागे घेण्यात यावी, या मागणीचे निवेदन काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. धवलसिंह मोहिते-पाटील यांच्या नेतृत्वाखाली अपर तहसीलदार राजशेखर लिंबारे यांना देण्यात आले.



# ७१.९५ कोटी रुपये पाणी पुरवठा योजनेचे उत्तमराव जानकर यांच्याहस्ते भूमिपूजन

✔ सुराज्य/वेळापूर

ग्रामपंचायत वेळापूर. यांच्यावतिने ७१.९५ कोटी रुपयांच्या हर घर नल से जल जल जीवन योजनेचे भूमिपुजन राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्ह्याचे नेते

उत्तमराव जानकर यांच्या हस्ते श्रीफळ फोडून वेळापूर ग्रामपंचायत तलाव या ठिकाणी भूमिपूजन करण्यात आले.

यावेळी उत्तमराव जानकर म्हणाले की ७१.९५ कोटी रुपयांची ही योजना पूर्ण झाल्यानंतर वेळापूर गावातील व वाड्या वस्तीवरील प्रत्येक घरात शुद्ध पाणी पिण्यास मिळणार आहे असे सांगितले.

या कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्ह्याचे नेते उत्तमराव जानकर, वेळापूर विद्यमान सरपंच रजनीश बनसोडे, रिपाई तालुका अध्यक्ष व यात्राकमिटीचे अध्यक्ष मिलिंद सरतापे, उपसरपंच तानाजीकाका चव्हाण, मार्केट कमिटीचे माजी संचालक दादासाहेब घाडगे, काशिनाथबापू आडत, माणिकाअण्णा चव्हाण, माजी उपसरपंच जावेद मुलाणी, संदीपतात्या माने देशमुख, निवृत्ती भुसारे, नामदेव देवकते, हनुमंत वायदंडे, नानासो मुंगुस्कर, बाबासाहेब माने, शंकर आडत, विश्वास वाघे, महादेव मेहत्रे, विनायक माने, चंद्रकांत पोळ, मोहन कचरे, जवान माने देशमुख, नागेश क्षीरसागर, अमोल पनासे, रणजीत सरवदे, गणेश साठे, धनंजय शिवपुजे, दादा मदडे, कल्याण मदडे, बंडू घोरपडे , संजय माने, मदडे अण्णा, आप्पा कांबळे, लक्ष्मण घोरपडे, आयाज मुलाणी, विकास चव्हाण, दत्ता येडगे, महेश देवकते, सुरेश जाधव यांच्यासह ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.



## पंचशील प्राथमिक व माध्यमिक प्रशालेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

✔ **सोलापूर** : १४ एप्रिल मानवता विकास मंडळ संचलित पंचशील प्राथमिक व माध्यमिक प्रशालेत संस्थेचे अध्यक्ष श्रीशैल रणधिरे, सचिव स्मिताताई लोंढे,उपाध्यक्ष आयु मसाजी गोतसुर्वे, खजिनदार भिमराव गोतसुर्वे , संचालक महेश रणधिरे, माध्यामिक विभागाचे मुख्याध्यापक महानिंग यलगोंडे, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापिका महामाया रणधिरे यांच्या प्रमुख पाहुणे भीम प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष आयु.बाबा बाबरे ,आई प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश नामदेव राठोड जाई जुई विचार मंचचे अध्यक्ष बंटी चंदनशिवे, सावित्रीबाई फुले मागासवर्गीय मुलींचे वसाहती गृह संचालिका साहेरा शेख, फोटोग्राफर आयु वाघमारे यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून बुद्ध वंदना घेवून विनम्र अभिवादन करण्यात आले. रंजउषा बहुउद्देशीय मागासवर्गीय संस्था अध्यक्ष शितल कांबळे उपाध्यक्ष सविता फडतरे यांच्या वतीने शाळेतील विद्यार्थ्यांना वही व पेन याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थी भाषणामध्ये प्रणाली गोतसुर्वे कु. शेख कु.श्रुती व्हणमाने यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळासाहेब चटे व आभार प्रदर्शन लिंगन्ना कोरे यांनी केले.

## स्वामी समर्थ कारखान्यासाठी २९ टक्के मतदान

✔ **अक्कलकोट** : दहिटणे ता.अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ सहकारी साखर कारखाना ची निवडणुक रविवारी ४८ केंद्रावर पार पडली. मतदारांमध्ये निरूत्साह होता. एकुण २०६०१ मतदारांपैकी ६०१७ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.एकुण मतदानाची टक्केवारी २९.२१ टक्के इतकी झाली. ६ जागा साठी १५ उमेदवार मतदानासाठी रिंगणात होते. कित्येक मतदारांना मतदान आहे हेच माहित नव्हते.कोणीच मतदारांना संपर्क केला नाही.त्यामुळे मतदानाची टक्केवारी कमी झाली. निवडणुक निर्णय अधिकारी म्हणून किरण गायकवाड यांनी काम पाहिले.सोमवारी मतमोजणी असुन प्रियदर्शन मंगल कार्यालय येथे सकाळी ८ वाजल्या पासून सुरू होणार आहे. लगेच निकाल लागणार आहे.

## दुचाकी घसरल्याने महिला जखमी

✔ **सोलापूर** : स्पीड ब्रेकरवरून दुचाकी घसरल्याने दुचाकीवरून खाली पडून महिला जखमी झाली. ही घटना विकास नगर परिसरात शुक्रवारी रात्री घडली. शबाना फयाज शेख (वय-३०,रा.मित्र नगर,शेळगी) असे त्या जखमी महिलेचे नाव आहे. त्या शुक्रवारी रात्री पतीच्या मोटरसायकलच्या पाठीमागे बसून जाताना हा अपघात झाला. त्यांना उपचाराकरिता छत्रपती शिवाजी महाराज शासकिय रुग्णालयात बेशुद्ध अवस्थेत पती फयाज याने दाखल केले.या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे.

## महापालिका व प्राथमिक शिक्षण मंडळ सेवक गृहनिर्माण संस्थेतर्फे पाणपोई

✔ **सोलापूर** : नियोजित महानगरपालिका व प्राथमिक शिक्षण मंडळ सेवकांची गृहनिर्माण सहकारी संस्थेच्या वतीने भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त प्राथमिक शिक्षण मंडळ कार्यालय (नवी पेठ) समोर पाणपोईचे उद्घाटन मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी हनुमंत जाधवर यांच्या हस्ते पाणपोईचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ कामगार नेते जनार्दन शिंदे, कामगार नेते चांगदेव सोनवणे, पत्रकार संघाचे अध्यक्ष किरण बनसोडे, भालचंद्र साखरे हे उपस्थित होते याप्रसंगी पर्यवेक्षक सुरेश कासार, भगवान मुंडे, ताहीर कारभारी, केरबा माने, शिवाजी कांबळे, नितीन तळभंडारे, बापू सातपुते, प्रकाश पाडुळकर, गणेश अंजीखाणे, अजीम शेतसंधी, मेहबूब तांबोळी, नरसिंग चिप्पा, राजू उत्तरकर, सचिन साखरे आदी उपस्थितीत होते.

## सम्राट सामाजिक संस्थेच्यावतीने प्रबोधनपर पथनाट्य सादरीकरण

✔ **सोलापूर** : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२ व्या जयंतीनिमित्त येथील सम्राट बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्यावतीने प्रबोधनपर पथनाट्याचे आयोजन करण्यात आले होते. शेष सांस्कृतिकच्या कलाकारांचा या पथनाट्यात सहभाग होता. सोलापुरातील पार्क चौक, सात रस्ता, सैफुल, आसरा आदी ठिकाणी पथनाट्य सादर करण्यात आले. श्रेयस कोणदे, श्रुती लालसरे, अंजली सलगर, आदित्य पांडे, रुद्र बेसरे, समृद्धी शिंदे, मनोज घोरपडे, बसवराज बेरे, सावर्णी व्हनमाने, सम्राट बनसोडे, मुकेश जमादार या कलाकारांचा पथनाट्यात सहभाग होता.

# बार्शीत डॉ आंबेडकर जयंती मिरवणुकीने वेधले लक्ष

✔ सुराज्य/बार्शी

येथील राज-विजय क्रीडा, शैक्षणिक व सांस्कृतिक मंडळ व गौतम बुद्ध मागासर्गीय बहुद्देशीय संस्थेच्यावतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२ व्या जयंतीनिमित्त डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीतील ढोल ताशा पथक, पारंपरिक वाद्ये, डीजे व बेन्जो पथकांनी बार्शीकरांचे लक्ष वेधले खास करून कर्नाटकातील लोकनृत्य गारुडी गोम्बे हे विशेष आकर्षण ठरले.

प्रारंभी येथे आमदार राजेंद्र राऊत यांच्या हस्ते डॉ आंबेडकर यांच्या तसेच सर्व महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मिरवणुकीचे उद्घाटन झाले. माजी नगराध्यक्ष असिफ तांबोळी, माजी नगरसेवक विजय राऊत, सहा. पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर उदार, विलास रेणके,



सुधीर बारबोले, चंद्रकांत पवार, माजी आरोग्य सभापती संदेश काकडे, उद्योजक रविंद्र राऊत, अमृत राऊत, मंडळाचे अध्यक्ष दीपक धावारे, उत्सव समितीचे अध्यक्ष प्रवीण रिकिबे, उपाध्यक्ष चेतन तुपेरे, खजिनदार विनोद बोकेफोडे, सचिव सनी भोसले, वाघमारे, व्यापारी शिंदे, जय शिवराय प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय राऊत, कोकाटे आदी उपस्थित होते.

मिरवणुकीच्या अग्रभागी गारुडी गोम्बे, भगवंत ढोल ताशा पथक व त्यापाठोपाठ डीजे बँजो लावण्यात आले होते. शेवटी फुलांनी सजवलेल्या ट्रॅक्टर ट्रॉलीवर मध्यभागी डॉ आंबेडकर यांचा पूर्णकृती पुतळा तसेच छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा बसवेश्वर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, क्रांतिसूर्य महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज यांचे पुतळे होते. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयघोषात मिरवणूक भोसले चौक, शिवाजी आखाडा, पोस्ट चौक, जुने पोलीस स्टेशन मार्गे नेण्यात आली. यावेळी भीमसैनिक डीजेच्या तालावर थिरकले.

## तरुणाला लोखंडी पाईपने मारहाण

✔ **सोलापूर** : शेतीच्या वादावरून एका तरुणाला लोखंडी पाईप व लाथा बुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना शुक्रवारी बेडरपूल येथे घडली. सुरज धनसिंग मैनावाले (वय-३२, रा. लोधी गल्ली,बेडरपूल) असे मारहाण झालेल्या त्या तरुणाचे नाव आहे. त्याला तीन जणांनी मिळून पाईप व लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. यात डोक्याला,हाताला,दोन्ही गुडघ्याला मार लागून सूरज जखमी झाल्याने त्यांना उपचाराकरिता छत्रपती शिवाजी महाराज शासकिय रुग्णालयात दाखल केले.या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे.



## डॉ.बाबासाहेबांचे विचार विद्यार्थ्यांसाठी दिशादर्शक : वाघमारे

### विद्यार्थी अनुयायांसाठी प्रबोधनात्मक पुस्तकाचे प्रकाशन

✔ सुराज्य/सोलापूर

विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे क्रांतीकारक विचार आजच्या विद्यार्थ्यांना दिशादर्शक आहेत. त्यासाठी बाबासाहेब पुस्तकातून समजून घेणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष आण्णासाहेब वाघमारे यांनी केले.

डॉ. सुरेश कोरे हे चालू वर्षी भीमविचारांची जयंती साजरी करत आहेत. त्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची निवडक भाषणे जसीच्या तशी प्रकाशित करून ती मोफत वितरण करीत आहेत. त्याच मालिकेतील सातव्या पुस्तकाचे प्रकाशन मिलिंद नगर बुद्धविहारात भंते बी. सारीपुत्त यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी डॉ. सुरेश कोरे, धम्मरक्षिता कांबळे, डॉ ज्योत्स्ना कोरे, डॉ. खरे, व्ही. डी. गायकवाड, छाया कांबळे, गुणा सूर्यवंशी, रंजना दिलपाक, सरचिटणीस नागसेन माने, बुद्धरत्न लंकेश्वर, यशवंत साबळे, रत्नदीप कांबळे, नागप्पा कोरे, सुधीर माने, एम.डी. शिंदे, हेमलता माने, डॉ. घोरपडे, डॉ. खरे, पत्रकार किरण बनसोडे आदी उपस्थित होते.

डॉ. सुरेश कोरे यांनी आतापर्यंत डॉ. आंबेडकरांच्या भाषणाची ७ महिन्यात ७ पुस्तके प्रकाशित केली असल्याचे प्रास्ताविकात सांगितले. वर्षभर भीमविचारांची जयंती आपण यामाध्यमातून साजरी करत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमात भारतीय बौद्ध महासभेच्या जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल आण्णासाहेब वाघमारे तर सरचिटणीसपदी नागसेन माने, महापालिका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल किरण बनसोडे आणि पत्रकारितेत १८ वर्ष पूर्ण झाल्याबद्दल विजय गायकवाड यांचा सत्कार करण्यात आला. शेवटी आभार डॉ. ज्योत्स्ना कोरे यांनी मानले.

## सासरी आलेल्या जावयावर चाकूने हल्ला

✔ **सोलापूर** : स्वतः च्या मुलांना सोडायला सासरी आलेल्या जावयास लाथा बुक्क्यांनी व चाकूने हल्ला करून जखमी केल्याची घटना लोधी गल्लीत शुक्रवारी घडली. जखमी जावयावर छत्रपती शिवाजी महाराज शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. राहुल उदयसिंग दवेवाले (वय-३४, रा. लोधी गल्ली) असे जखमी झालेल्या जावयाचे नाव आहे. राहुल दवेवाले व त्यांची पत्नी वेगवेगळे राहतात. त्यामुळे राहुल हा आपल्या मुलांना फिरवण्यासाठी सासरी येऊन कधी कधी घेऊन जात असतो. त्याप्रमाणे तो शुक्रवारी मुलांना आपल्या सोबत घेऊन जाऊन रात्री साडेदहा वाजता सोडायला सासरी आला असता मुलांना सोडायला इतका उशिरा का झाला म्हणून वाद करत सार्वजनिक रस्त्यावरच राहुल यास लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

## अर्धवेळ ग्रंथपालाची नियुक्ती ही पूर्णवेळ ग्रंथपाल म्हणून राहणार

✔ सुराज्य/सोलापूर

शाळांतील मुलांच्या संख्येनुसार अनेक शाळेत अर्धवेळ ग्रंथपालांची नियुक्ती करण्यात आली होती. या अर्धवेळ ग्रंथपालांना आता पूर्णवेळ ग्रंथपाल म्हणून नियुक्ती करण्यात. येणार आहे. राज्यातील १२७६, तर जिल्ह्यातील ६८ जणांना या निर्णयाचा लाभ होणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय व अल्पसंख्याक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटनेच्या शासनाकडे अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ करण्यासंदर्भात पाठपुरावा केला होता. या मागणीला आता यश आले आहे. प्रथम दोन हजारांवर विद्यार्थिसंख्या असलेल्या शाळांना पूर्णवेळ ग्रंथपाल मिळणार आहे. त्यानंतर तीन हजारांवर विद्यार्थी असलेल्या शाळांना १०६ पदे मिळतील. दोन व तीन शाळा एकत्रित करीत एक हजारावर विद्यार्थिसंख्या निश्चित होणार आहे. निर्माण होणाऱ्या पदांवर प्रथम अर्धवेळ ग्रंथपाल नियुक्त होणार आहे. सेवाज्येष्ठता आधारे व सलग पाच वर्षे सेवा झालेल्या मान्यताप्राप्त अर्धवेळ ग्रंथपालांनाच पूर्णवेळ पदाचा लाभ मिळणार आहे.

### अर्धवेळ ग्रंथपाल पद रद्द

अर्धवेळ पद असल्याने ग्रंथालये पूर्णपणे सक्षमतेने चालत नसल्याची तक्रार करण्यात आली होती. नव्या निर्णयाने ती दूर होणार आहे. नव्या आकृतिबंधानुसार राज्यातील सहावी ते बारावीपर्यंत एक हजारावर विद्यार्थी असणाऱ्या शाळांमध्ये पूर्णवेळ एक ग्रंथपालाचे पद मान्य करण्यात आले आहे. त्यानुसार २११८ पदे मंजूर होतात. तसेच अर्धवेळ ग्रंथपाल पद व्यपगत म्हणजे रद्द करण्यात आले आहे

# श्री भगवंतास दिंडी प्रदक्षिणेने बार्शीत अखंड हरिनाम सप्ताहाचा शुभारंभ

✔ सुराज्य/बार्शी

**डॉ. गुलाबराव व मिनाक्षी पाटील फाउंडेशन आयोजित श्रध्दा हॉस्पिटल बार्शीच्या पाचव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताह, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व संगीत तुलसी रामायण ज्ञानयज्ञ सोहळ्याचा शुभारंभ ग्रामदैवत श्री भगवंतास दिंडी प्रदक्षिणेने झाला.**

## श्रध्दा हॉस्पिटलच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजन

सकाळी बार्शीतील कासारवाडी रोड येथील श्रध्दा हॉस्पिटल येथे गुरुवर्य धर्मराज दादा महाराज सामनगावकर यांच्या प्रमुख उपस्थितीत डॉ. गुलाबराव पाटील व डॉ मीनाक्षी पाटील यांच्या हस्ते झाला. यावेळी डॉ रोहन पाटील व डॉ श्रध्दा पाटील, हॉस्पिटल स्टाफ, नवनाथ मुला मुलींची वारकरी शिक्षण संस्था व संवादिनी कलाकार यांच्या उपस्थितीत झाला. टाळ मृदुंग व हरिनामाचा गजर करीत भक्तिमय वातावरणात दिंडी भीमनगर येथून भगवंत मंदिर कडे मार्गस्थ झाली. तेथे श्री भगवंताची पूजा करून नंतर भगवंत मंदिरातून प्रमुख मार्गानेश्रध्दा हॉस्पिटल शेजारी कार्यक्रम स्थळी आली. त्यानंतर सकाळी ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन तुळशी रामायण कथा हरिपाठ झाला. त्यानंतर शंकर महाराज शेवाळे यांचे कीर्तन झाले.



यावेळी डॉ. पाटील म्हणाले, गेल्या पाच वर्षात हॉस्पिटलने सामाजिक जाणिवा जपत रूग्णसेवा केंद्रबिंदु मानत विविध व्याधींवर निदान, उपचार, शस्त्रक्रिया सेवा दिली आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञान व प्रशिक्षित वैद्यक, तंत्रज्ञ व प्रशिक्षित कर्मचारी हे या हॉस्पिटलचे वैशिष्ट्य आहे. समाजातील धार्मिक श्रध्दाभाव दृढ व्हावा या हेतुने या उपक्रमाचे आयोजन केले आहे.

हे कार्यक्रम दि २३ एप्रिल पर्यंत दररोज विविध कार्यक्रम होणार आहेत.

### आज होणारे कार्यक्रम

दि १७ रोजी सकाळी काकडा व नंतर विष्णू सहस्त्रनाम, ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, आरोग्य विषयक मार्गदर्शन, तुलसी रामायण कथा, हरिपाठ असे दिवसभरात कार्यक्रम होणार असून सायंकाळी ७.३० ते म्हणाले१० या वेळेत भिवंडी येथील वनिताताई महाराज पाटील यांचे किर्तन होणार आहे. सात दिवस दररोज दुपारी वृंदावन धाम येथील शिवराज शास्त्री महाराज यांचे तुलसी रामायण होणार आहे.



## माजी विद्यार्थ्यांमध्ये शाळा व शिक्षक यांच्याबद्दल कृतज्ञतेची भावना : बनसोडे

मंगळवेढा : मंगळवेढा तालुक्यातील भोसे येथील जिल्हा परिषद शाळेतील माजी विद्यार्थी मित्र परिवार यांनी शिक्षक व शाळेबद्दल कृतज्ञतेची भावना तब्बल ३० वर्षानंतरही जपून स्नेह संवाद कार्यक्रमाच्या निमित्त ज्या उद्देशाने एकत्र आले आहेत.तो विचार आणि आपलेपणा हा आपुलकीने जपा, असे आवाहन दक्षिण सोलापूरचे गट शिक्षणाधिकारी मल्हारी बनसोडे यांनी केले. भोसे (ता. मंगळवेढा) येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व इंग्लिश स्कूलमधील सन १९८६ च्या बचच्या माजी विद्यार्थी मित्र परिवार यांनी आयोजित स्नेह संवाद २०२३ या कार्यक्रमप्रसंगी गट शिक्षणाधिकारी मल्हारी बनसोडे हे बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इंग्लिश स्कूल भोसेचे सेवानिवृत्त शिक्षक शिवाजीराव भगरे हे होते.यावेळी जि. प. प्रा. अकोलेचे सहशिक्षक विजय झिंजुरटे, माजी प्राचार्य एस. बी. गायकवाड, एल. एन. नागणे, एस. एम. पाटील, निंगप्पा बिराजदार यांच्यासह माजी विद्यार्थी - विद्यार्थीनी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी शाळेचे माजी विद्यार्थी सचिन तटाळे, सचिन सोनवणे, मारुती बनसोडे, नंदकुमार खडतरे, सचिन काळे, हिम्मत घाडगे, सावकर भुसे, नागनाथ घाडगे, अनिल गंगधरे, सुनीता काकडे, मिनाक्षी आवळेकर, सुनीता दुधाळ आदींनी परिश्रम घेतले.



## डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त आईस्क्रीम व जिलेबी वाटप

अकलूज : भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून सम्राट प्रतिष्ठान यांच्यावतीने १४ एप्रिल रोजी डॉ. आंबेडकर चौक येथे आईस्क्रीम व जिलेबी वाटप उर्वशीराजे धवलसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सम्राट प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष शशिकांत भोसले, अरुणा कांबळे, ज्योती कुंभार, अभिजीत गुरव, अजिंक्य लाडे, सागर ठाकुर, प्रवीण रोडे, सुनील धोत्रे, महेश कांबळे, अमोल भोसले, बबलु कांबळे, आशिष सावंत, सिध्दार्थ गायकवाड व सम्राट प्रतिष्ठानचे सदस्य, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी अकलूज ग्रामपंचायत माजी सदस्य उर्वशीराजे मोहिते पाटील यांनी सम्राट प्रतिष्ठानने आगळा वेगळा उपक्रम घेतल्याबद्दल त्यांचे कौतुक करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी सम्राट प्रतिष्ठानचे अध्यक्ष शशिकांत भोसले म्हणाले की, ‘सम्राट प्रतिष्ठानच्यावतीने नेहमी सामाजिक उपक्रम राबविले जातात. कोणते ना कोणते औचित्य साधुन शालेय मुलांना शालेय साहित्य वाटप करणे, विविध महापुरूष यांची जयंती साजरी करणे, जयंतीनिमित्त विविध प्रकारच्या उपक्रमांचे आयोजन करणे, रक्तदान शिबिरे आयोजित करणे अशा विविध प्रकारच्या उपक्रमांमुळे सम्राट प्रतिष्ठानचा ठसा माळशिरस तालुक्यात उमटला आहे. विविध प्रकारच्या सामाजिक उपक्रमांमुळे सम्राट प्रतिष्ठानचे कौतुक सर्व स्तरातून होताना दिसत असल्याचे भोसले म्हणाले.



## महावितरणच्या डीपीचे उद्‌घाटन

वेळापूर : तांदुळवाडी तालुका माळशिरस येथील वार्ड क्रमांक पाच मधील महावितरणच्या डीपीचे उद्‌घाटन १५ एप्रिल रोजी करण्यात आले. वार्ड क्रमांक पाच मधील विजेचा प्रश्न जिल्हा नियोजन समितीचे माजी सदस्य व तांदळवाडी ग्रामपंचायतचे मार्गदर्शक ॲड. नागेश काकडे यांनी सोडविला आहे. यांच्या प्रयत्नातूनच वार्ड क्रमांक दोनमधील महावितरणच्या डीपीचे काम पूर्ण झाले आहे. त्याबद्दल वार्ड क्रमांक पाचमधील शेतकरी आणि ग्रामपंचायत सदस्य यांच्यावतीने ॲड. नागेश काकडे यांचा सन्मान करण्यात आला. ॲड. नागेश काकडे यांनी दिलेला शब्द पूर्ण करून शेतकऱ्यांचा दहा वर्षाचा विजेचा प्रश्न मार्गी लावला आहे. या परिसरात डीपीचे काम झाल्याने शेतीच्या पंपाला वीजपुरवठा सुरळीत झाल्याने शेतकरी वर्गांमधून ॲड. नागेश काकडे यांनी शेतकऱ्यांचे एक चांगले काम केल्याबद्दल शेतकरींवर्गातून त्यांना दुवा देत आहेत. दोन डिपींची कामे पुर्ण झाली आहेत. हा कार्यक्रम माजी ग्रामपंचायत सदस्य शिवाजी दुधाट यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या कार्यक्रमाला अशोक जाधव, माजी उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य शशिकांत कदम, ग्रामपंचायत सदस्य सतीश कदम, आकाश कदम, लक्ष्मण मासाळ, भीमा गुजरे तसेच महावितरणचे अधिकारी, शिवनेरी रोपवाटिकाचे मालक बळीराम जाधव, अनिल चव्हाण, कुलदीप निंबाळकर, सुहास कदम, तांदुळवाडीचे वायरमन समाधान जगताप व ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

## दिगंबर जैन ऑनलाइन संमेलनात २१८ वधू-वर सहभागी

सोलापूर : दिगंबर जैन पंचम समाज विकास मंडळ सोलापूरच्या ’सप्तपदी’ वधू-वर परिचय समितीतर्फे रविवारी झालेल्या ऑनलाइन संमेलनात (मेळावा) जगभरातून घरबसल्या २१८ वधू-वर सहभागी झाले होते. त्यात ६० वधूंचा समावेश होता. यात सहभागी झालेल्या आणि पुढे सहभागी होणाऱ्या वधू-वरांना सहा महिने एकमेकांचे बायोडाटा पाहता येणार आहेत.

या ऑनलाइन सेवेचा लाभ सहा महिनेपर्यंत घेता येणार आहे. विजापूर रोडवरील कुबेर चेंबर्स, विद्यावाचस्पती पंडित वर्धमान शास्त्री सांस्कृतिक भवन येथे या संमेलनाचे उद्घाटन सकल दिगंबर जैन समाजाचे अध्यक्ष हर्षवर्धन शहा, कोल्हापूरचे अतुल होनोले, जैन कासार विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष हुकुमचंद हेसे, भारतीय जैन संघटना जिल्ह्याचे सहकोषाध्यक्ष कोमल पाचोरे, जैनस्कोचे सहसचिव नेमचंद आग्रे, जैन पंचम समाजाचे सल्लागार अरविंद जमगे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. उपस्थितांचे स्वागत अनिल माणिकशेटे, सुमेरचंद जमालपुरे, देवेंद्र शेटगर, अनुप कस्तुरे, राजकुमार कस्तुरकर यांनी केले. प्रास्ताविकात डॉ. अजित माणिकशेटे यांनी ऑनलाईन वधू-वर मेळाव्याचे महत्त्व व उपयोगिता पटवून दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुवर्णा कटारे यांनी केले. देशभूषण व्हसाळे यांनी आभार मानले.

# अक्कलकोट येथे उद्या स्वामी समर्थांचा पुण्यतिथी सोहळा

### पारंपरिक धार्मिक कार्यक्रमांना अनन्यसाधारण महत्त्व


### मूळस्थान वटवृक्ष मंदिरात परंपरेप्रमाणे महाप्रसाद, पालखी सोहळ्याचेही आयोजन

सुराज्य/अक्कलकोट

येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान म्हणजे ब्रम्हांडनायक श्री स्वामी समर्थांचे मूळस्थान होय. या पार्श्वभूमीवर येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात सालाबादप्रमाणे यंदाही श्री स्वामींचा १४५ वा पुण्यतिथी सोहळा मंदिर समितीच्यावतीने उत्साहात व भक्तिभावात संपन्न होत असल्याची माहिती मंदिर समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांनी दिली.

यंदा श्री स्वामी समर्थांचा १४५ वा पुण्यतिथी सोहळा असून या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त दि. ७ रोजी मागील ११ दिवसांपासून नित्य अनुष्ठान, धर्मसंकीर्तन, पारायण, भजन, अखंड नामवीणा सप्ताह इत्यादी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहेत, ते नियमितपणे वेळेवर संपन्न होत आहेत. मंगळवार दि. १८ रोजी श्री स्वामी समर्थ महाराजांच्या १४५ व्या पुण्यतिथी महोत्सवाचा प्रमुख दिवस आहे.

श्री स्वामी पुण्यतिथी दिनी पहाटे २ वाजता श्रींची काकड आरती होईल. तदनंतर श्री स्वामी समर्थांचे नामस्मरण होईल. पहाटे ३ ते ५ या वेळेत नगर प्रदक्षिणा पार पडेल. देवस्थान व अक्कलकोट राजघराण्याच्या वतीने श्रींना पारंपारिक लघुरुद्र पहाटे ४ ते ६ या वेळेत करण्यात येईल. सत्संग महिला भजनी मंडळ यांच्या भजनाने अखंड नामवीणा सप्ताह समाप्ती सोहळा स. ६ वा.



देवस्थानच्या ज्योतीबा मंडपात होईल. स्वामी भक्तांच्यावतीने नित्यनियमाने होणारे अभिषेक भावीकांचे दर्शन सुलभतेने होणेकरिता बंद ठेवण्यात येतील. जे स्वामी भक्त अभिषेकाची पावती करतील त्यांना प्रसाद मिळेल. सकाळी ११ वाजता पुरोहित व मंदीर समितीची महानैवेद्य आरती, ११:३०वाजता अक्कलकोट राजघराण्याच्यावतीने श्रीमंत मालोजीराजे भोसले राजेसाहेब यांच्या हस्ते श्रींना महानैवेद्य अर्पण करण्यात येईल. त्यानंतर दुपारी १२ ते ३ या वेळेत मंदिराच्या पुर्वेकडील उपहारगृहात सर्व स्वामी भक्तांना पारंपारिक भोजन महाप्रसाद आयोजित केले आहे. दुपारी २ ते ४ या वेळेत कोल्हापूर येथील महाद्वार स्वामी सेवा भजनी मंडळ यांची भजनसेवा देवस्थानच्या ज्योतीबा मंडपात संपन्न होईल. सायंकाळी ५:३० ते रात्री १० या वेळेत श्रींचा सजविलेला सवाद्य पालखी मिरवणूक सोहळा वटवृक्ष मंदिरातून निघेल.

पालखी मार्ग फत्तेसिंह चौक, मेन रोड, कापड बाजार, कारंजा चौक, बुधवार पेठ, समाधी मठ, परतीचा मार्ग बुधवार पेठ, कारंजा चौक, दक्षिण पोलीस स्टेशन समोरून मौलाली गल्ली, सुभाष गल्ली, गुरू मंदिर, भारत गल्ली, देशमुख गल्ली, स्वामी गल्ली असे असेल. वटवृक्ष मंदिरात रात्री १० वाजता पालखी सोहळा आल्यानंतर देवस्थानच्यावतीने सर्व स्वामीभक्तांना शीरा प्रसाद वाटप करण्यात येईल. श्री स्वामी समर्थांच्या पुण्यतिथीनिमित्त स्वामी दर्शनाकरिता येणाऱ्या सर्व स्वामी भक्तांचे दर्शन सुलभतेने होणेकरिता मंदीराच्या बाहेर स्वामी भक्तांची रांग लागल्यास दर्शन रांगेची राजे फत्तेसिंह चौकापर्यंत एकेरी लाईनचे कापडी मंडप मारून विशेष सोय करण्यात येणार आहे.

या पार्श्वभूमीवर स्वामी भक्तांना पादत्राण कक्षाची (चप्पल स्टँड) ची सोय देवस्थानच्या मुरलीधर मंदिर समोरील परिसरात करण्यात येईल. दि. १९ रोजी दुपारी ३ ते सायं. ७ या वेळेत मंदिरात गोपाळकाला होऊन श्री स्वामी समर्थांच्या १४५ व्या पुण्यतिथी महोत्सवाचा सांगता समारंभ होईल. दि. २० रोजी देवस्थानच्या मुरलीधर मंदीरात सर्व स्वामी भक्त, सेवेकरी, भजनकरी, विणेकरी, प्रभात फेरीस येणारे भाविक, पारायणास बसलेले भाविक, देवस्थान कर्मचारी, सेवेकरी, सर्व पोलीस कर्मचारी यांना दुपारी १२ ते ३ या वेळेत श्रम परिहार-भोजन महाप्रसाद देण्यात येणार आहे, तरी सर्व भाविकांनी श्रींच्या दर्शनाचा, महाप्रसादाचा, पालखी सोहळा सेवेचा व प्रसादाचा लाभ घेवून आपले जीवन स्वामी सेवा सहवासाने कृतार्थ करुन घ्यावे, असे आवाहन मंदिर विश्वस्त समितीतर्फे समितीचे चेअरमन व माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक महेश इंगळे यांनी केले आहे.



## सम्यक प्रज्ञा शोध परीक्षा उत्साहात

सुराज्य/सोलापूर

महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त सम्यक ॲकॅडमी आणि लोकराजा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सम्यक प्रज्ञा शोध परीक्षा - २०२३ या शिष्यवृत्ती परीक्षेचे आयोजन रविवार दि. १६ एप्रिल २०२३ रोजी सोलापूर, मोहोळ आणि पंढरपूर या केंद्रावर करण्यात आले होते. या परीक्षेस विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याची माहिती बुद्धजय भालशंकर यांनी दिली.

भारतीय संविधान आणि फुले-शाहू-आंबेडकर यांचे सामाजिक कार्य या विषयावर ही परीक्षा घेण्यात आली होती. परीक्षेच्या यशस्वितेसाठी आशुतोष तोंडसे, राहुल साखरे, उपप्राचार्य प्रा. पी. एस. शिंदे, मुख्याध्यापक महादेव कांबळे, मुख्याध्यापक सत्यवान पाचकुडवे, पांडुरंग दराणे, नवनाथ गायकवाड यांनी परिश्रम घेतले.

## पत्नीशी अनैसर्गिक संबंध ठेवत केला छळ

### पती, सासूवर गुन्हा दाखल

सुराज्य/सोलापूर

**पत्नीशी अनैसर्गिक संबंध ठेवत तिचा छळ केल्याप्रकरणी पतीवर व सासूवर गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत पीडितेने फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.**

पीडित महिलेचा आरोपीसोबत जानेवारी २०२३ मध्ये विवाह झाला होता. विवाहानंतर आरोपी पतीने पीडितेसोबत मासिक पाळी दरम्यान तिच्या इच्छेविरुध्दही तिच्याशी अनैसर्गिक संबंध ठेवले. शिवाय शिवीगाळ करत हाताने व पायाने मारहाण करून पीडितेला कोंडून ठेवले. तर सासूने मानसिक त्रास दिला. तसेच आरोपींचे पूर्वी लग्न झाल्याची बाब पीडितेपासून आरोपींनी लपवली, अशा आशयाची फिर्याद पीडितेने दिली आहे. या फिर्यादीवरून आरोपी पती व सासूवर गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा तपास पोलीस करत आहेत.

## डुप्लिकेट चावीचा वापर करून दुचाकी पळवली

सुराज्य/सोलापूर :

अज्ञात चोरट्याने डुप्लिकेट चावी चा वापर करून दुचाकी क्र. एमएच.१३. बीयु.०८८१ ही चोरून नेली आहे. ही घटना ९ एप्रिल रोजी रात्री भगवान नगर येथे घडली.

याप्रकरणी चंद्रशेखर दत्तात्रय गडगी (वय-४९, रा. भगवान नगर, न्यू पाच्छा पेठ) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल दुधाळे हे करीत आहेत.

## सोलापुरात मास लिडर टॅलेंट सर्च परीक्षेचे आयोजन

सुराज्य/सोलापूर

**‘मनुष्यनिर्माणातून राष्ट्र पुनरुत्थान’ हे घोषवाक्य घेऊन आपली वाटचाल करणाऱ्या सारथी फाउंडेशनच्यावतीने यावर्षी (२०२२-२३) १० वी बोर्ड परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांसाठी 'मास लीडर टॅलेंट सर्च परीक्षेचे** (MLTSE) **आयोजन करण्यात आल्याची माहिती फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीनिवास बुरा यांनी दिली.**

मास लिडर टॅलेंट सर्च् परीक्षा’ (MLTSE) पूर्णपणे मोफत आहे. ही परीक्षा मराठी आणि इंग्रजी भाषेत असेल. निवड प्रक्रिया प्रथम फेरीत लेखी परीक्षा व द्वितीय फेरीत मुलाखत असे स्वरूप आहे. लेखी परीक्षा १०० गुणांची असेल आणि ती दि. ३० रोजी होईल. सोलापूर शहरात काही मोजक्या शाळेत परीक्षा केंद्र असेल. परीक्षा कालावधी २ तासांचा असेल. गुगल फॉर्मद्वारे नावनोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांना हॉल तिकिट व्हॉट्सपद्वारे दि. २७ रोजी वैयक्तिक पाठविण्यात येईल. त्यामध्ये परीक्षा केंद्र, सीट नंबर इत्यादी माहिती असेल. लेखी परीक्षा झाल्यानंतर मेरीट लिस्टमधील पहिल्या १०० ते २०० विद्यार्थ्यांची मुलाखत १५ मे रोजी होईल. मुलाखत ही अतिशय सोपी आणि इंटरेस्टिंग असेल. ही मुलाखत जीवनाकडे बघण्याचा दृष्टीकोन विकसित करणारे तसेच विध्यार्थ्यांना करियर, ध्येय, उद्दिष्ट निश्चित करण्यासाठी मदत करणारे असेल.

ही मुलाखत ५० गुणांची असेल. बक्षीसांचे स्वरूप प्रथम बक्षीस रुपये २०,०००, द्वितीय बक्षीस रुपये १५,०००, तृतीय बक्षीस रुपये १०,०००, उत्तेजनार्थ ५० बक्षीसे प्रत्येकी रुपये ५०० आहे. याशिवाय निवडक विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी पाच वर्षांसाठी प्रति वर्ष रुपये १०००० शिष्यवृत्ती सुध्दा देण्यात येणार आहे.

MLTSE परीक्षा ही ८ वी स्कॉलरशिप परीक्षेच्या धर्तीवर असेल. यामध्ये गणित, शास्त्र, बुद्धीमत्ता, सामान्यज्ञान या विषयाशी संबंधित प्रश्न असतील. परीक्षेचे स्वरूप वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्न असतील. या परिक्षेच्या आयोजनासाठी शिक्षण विभागातील सेवानिवृत्त अधिकारी अशोक भांजे यांचे विशेष सहकार्य लाभत आहे. गुगल लिंकद्वारे फॉर्म भरून आपली नाव नोंदणी करावी, असे आवाहन श्रीनिवास बुरा यांनी केले आहे. नावनोंदणीसाठी अंतिम मुदत २० एप्रिल पर्यंत आहे. अधिक माहितीसाठी ९४२०४८८९९१ व ८४८४०९०१९८ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.



## डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त वृक्षारोपण

सुराज्य/सोलापूर

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीनिमित्त कामगार शक्ती युनियनतर्फे मनपा प्राथमिक शिक्षण मंडळ कार्यालयाच्या कंपाऊंड परिसरात प्रशासनाधिकारी हनुमंत जाधवर यांच्या हस्ते कामगार शक्ती युनियनचे संस्थापक अध्यक्ष ज्येष्ठ कामगार नेते जनार्दन शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न झाले.

याप्रसंगी कामगार शक्ती युनियनचे जनरल सेक्रटरी चांगदेव सोनवणे प्रा. शिक्षण मंडळाकडील विभागीय अध्यक्ष तथा माजी चेअरमन भालचंद्र साखरे उपाध्यक्ष केरबा माने, पर्यवेक्षक सुरेश कासार, भगवान मुंडे, ताहिर कारभारी, सारंग अंजीखाने, खजिनदार शिवाजी कांबळे, भारतीय बौद्ध महासभेचे नागसेन माने, आण्णासाहेब वाघमारे, बापू सातपुते, रसूल तांबोळी आदी उपस्थित होते.

# अज्ञात चोरट्याने रोकडसह दागिने पळवले

सुराज्य/सोलापूर

राहत्या घरी रात्रीचे जेवण करून घराचा दरवाजा पुढे करून झोपी गेले असता, अज्ञात चोरट्याने पुढे केलेल्या दरवाजातून घरामध्ये प्रवेश करत फ्रिजवर ठेवलेला मोबाईल घरातील कपाटात ठेवलेले सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एकूण १ लाख २७ हजारांचा ऐवज चोरून नेला आहे.ही घटना दि. १४ ते १५ एप्रिल दरम्यान लक्ष्मी विष्णू चाळ येथे घडली.याप्रकरणी सलीम शेख (वय-३२, रा. लक्ष्मी विष्णू चाळ) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक धायगुडे हे करीत आहेत.

**सुनंदन कॉम्प्लेक्समधून दुचाकी लंपास**

सुनंदन कॉम्प्लेक्स येथे दुचाकी क्र.एमएच.१३. एवी.६५४१ ही अज्ञात चोरट्याने दि.६ एप्रिल रोजी चोरून नेली आहे. याप्रकरणी रमेश पांडुरंग केत (वय-३९, रा. सुनंदन कॉम्प्लेक्स) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार मनोहर हे करीत आहेत.

**पार्क चौकातील फुटपाथवर सोडलेल्या चपलांची चोरी**

संशयित आरोपी योगीराज सुभाष शिरगण (रा. आकाशवाणी केंद्र कुंभारी रोड) व श्रीनिवास बाबुराव गणपती (रा.राम मंदिर जवळ, सुनील नगर) यांनी मिळून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यासाठी आलेल्या नागरिकांनी पार्क चौक येथील उघड्या जागेवर पायातील चपला सोडलेल्या असताना त्यांच्या चपला मुद्दामून लबाडीने चोरून नेल्या आहे.ही घटना १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा पार्क चौक सोलापूर येथे घडली. अशा आशयाची फिर्याद पोलीस शिपाई रामा हरिदास भिंगारे यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात दिली आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक गायकवाड हे करीत आहेत.

**तरूणास मारहाण करत दागिनेसह मोबाईल पळवला**

फिर्यादी शरण रवींद्रनाथ नवणी (वय-३२, रा. प्रगती कॉलनी सेडाम रोड, गुलबर्गा) हे मुंबई येथे खाजगी कामानिमित्त




जायचे असल्याने सोलापूर रेल्वे स्टेशन पोलीस चौकी शेजारील मोकळ्या जागेत आले असता, अज्ञात तीन अनोळखी इसमानी फिर्यादी जवळ येऊन हाताने व लोखंडी रॉडने मारहाण करून निघून गेले. त्यानंतर फिर्यादी हे वरील ठिकाणी बॅग ठेवून झोपले असता, अज्ञात इसमाने फिर्यादी यांच्या गळ्यातील सोन्याची चैन व मोबाईल चोरून नेला आहे. ही घटना दि. १४ एप्रिल रोजी रात्री साडेबारा ते एक वाजण्याच्या दरम्यान घडली. अशा आशयाची फिर्याद शरण नवणी यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात दिली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून तीन अज्ञात इसमा विरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार मुलाणी हे करीत आहेत.

**चोरट्याने घरासमोरून दुचाकी पळवली**

अज्ञात चोरट्याने घरासमोर हॅण्डल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्र.एम.एच.१३.डि.एक्स. ६२१३ ही चोरून नेली आहे. ही घटना १४ एप्रिल रोजी सोनिया नगर येथे दुपारी एक ते तीन वाजण्याच्या दरम्यान घडली. याप्रकरणी शफिक इस्माईल शेख (वय-२८, रा. सोनिया नगर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार सोनार हे करीत आहेत.

**दुचाकींची तरुणाला धडक**

फूड डिलिव्हरीकरिता अजिंक्य हॉटेल येथील ऑर्डर घेऊन होटगी रोडकडे जात असताना सेवासदन शाळेसमोरील रस्त्यावर दुचाकी क्र. एम.एच.१३.डीएच.६१४४ ही दुचाकी भरधाव वेगात व निष्काळजीपणे चालवून फिर्यादी समर्थ श्रीनिवास देवकर (वय-२३, रा. रविवार पेठ) सोलापूर याला धडक दिली आहे. ही घटना १४ एप्रिल रोजी घडली. याप्रकरणी समर्थ देवकर यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्याच्या फिर्यादीवरून दत्ता बहिरू सर्वगोड (वय-३८, रा. देशमुख पाटील वस्ती) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार पोळ हे करीत आहेत.

**खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी १९ जणांवर गुन्हा**

नातेवाईकांच्या वाढदिवसासाठी घरासमोर मंडप मारल्याच्या कारणातून बुद्धभूषण जगन्नाथ कांबळे (वय-२१, रा. राजीव गांधीनगर) यांच्यावर खुनी हल्ला केल्याप्रकरणी १९ जणांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश न्यायायालने दिले होते. या आदेशानुसार १९ जणांवर जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

विशाल सोपान साबळे, सुधीर जयसिंग बिडबाग, जयसिंग दगडू बिडबाग, सुरज जयसिंग बिडबाग, किरण शंकर गायकवाड, रोहित सोपान साबळे, शुभम प्रल्हाद होटकर, सनी सुरेश साबळे, गौतम लक्ष्मण कसबे, विजय कल्लप्पा कांबळे, आकाश रवी चंदनशिवे, सुनील राजू रोकडे, अभी सुरेश साबळे, वैभव मल्हारी चौटमौल, सावित्री जयसिंग बिडबाग, प्रियंका सूरज बिडबाग, वैजयंती सुधीर बिडबाग, ज्योती सुनील उबाळे, रंजना ऊर्फ रेशमा गायकवाड (सर्व रा. सोलापूर) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास पोसई ताकभाते करत आहेत.

# पुण्यातील दुचाकी पेटवण्याचे लोण कुर्डूवाडीत; पाच दुचाकी व एक रिक्षा जळून खाक

✔ सुराज्य/कुर्डुवाडी

**कुर्डुवाडी शहरातील रद्दी, पुष्ठा व प्लास्टिक गोळा केलेल्या गोडाऊनला व काही अंतरावर असलेल्या गॅरेज समोरील लावलेल्या मोटरसायकलला अज्ञातांनी आग लावली. या आगीत सुमारे ३ लाख २० हजारांचे नुकसान झाले. ही घटना दि.१५ रोजी रा.१ वा सुमारास दास प्लॉट येथे घडली. याबाबत अनिलकुमार बाबुलाल बेनकर यांनी अज्ञात व्यक्तींविरुद्ध कुर्डुवाडी पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.**

माहिती अशी की फिर्यादी बेनकर रात्री झोपले असता त्यांच्या शेजाऱ्यांनी रात्री १ वा त्यांना उठवून तुमच्या गोडाऊन ला आग लागल्याचे सांगितले. त्यावेळी गोडाऊनातील प्लास्टिक गठ्ठे, पुठ्ठा, दोन मोटरसायकल, तीन चाकी मालवाहतूक रिक्षा, गोडाऊन मधील मशिनरी व शेजारी काही अंतरावर असलेल्या गॅरेज समोरील दोन मोटरसायकली जळून खाक झाल्या .या आगीत सुमारे तीन ते चार लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. आगीची माहिती मिळताच कुर्डुवाडी नगरपालिकेची दोन अग्निशामक, आमदार बबनराव शिंदे कारखान्यावरील एक व भैरवनाथ शुगर सोनारीच्या अग्नीशामकवदलाच्या माध्यमातून तीन तासाच्या अथक प्रयत्न नंतर आग विझवण्यात आली. यामध्ये कोणतीही जीवित हानी झाली नाही. आग विझवण्यासाठी उशीर झाला असता तर परिसरातील घरामध्ये आग लागून मोठा अनर्थ घडला असता व आर्थिक नुकसान झाले असते. पुण्यातील पार्किंग मधील मोटरसायकल पेटवून देण्याचे लोन आता कुर्डुवाडीतही आले की काय म्हणून भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

यामध्ये हायड्रोलिक प्रेशर मशीन १ लाख रुपये, सहा महिन्यापूर्वी घेतलेली टीव्हीएस मोटरसायकल ६० हजार , तीन चाकी मालवाहतूक रिक्षा ९० हजार असा एकूण २ लाख ५० हजार व मुख्य रस्त्यालगत असलेल्या त्रिमूर्ती ऑटो गॅरेज समोर बाहेर ठेवण्यात आलेली चार मोटर आग लावण्यात आली यामध्ये दोन मोटरसायकल यामध्ये २० हजारांची बजाज डिस्कव्हर,५० हजारांची यामा कंपनीची दुचाकी जळून खाक झाली. या आगीत सुमारे ३ लाख २० हजारांचे नुकसान झाले आहे.



शिवसेना शहराध्यक्ष समाधान दास यांच्या घराच्या समोरच्या बाजूला गोडाऊन असल्यामुळे या घटनेची माहिती मिळताच शिवसेना जिल्हाप्रमुख प्रा. शिवाजी सावंत यांनी घटनास्थळी येऊन पाहणी केली.

व अशा घटना पुन्हा घडू नये यासाठी पोलिसांनी सीसीटीव्हीच्या माध्यमातून आग लावणाऱ्या व्यक्तिंचा तपास करुन कठोर कारवाई करण्याची त्यांनी मागणी केली.

पुण्यामध्ये पार्किंगच्या ठिकाणी मोटरसायकल पेटवण्याची लोन कुर्डूवाडीत शहरात आल्यामुळे नागरिकांमध्ये दुचाकी किंवा चारचाकी वाहने कुठे लावायची याची चिंता होत लागली आहे. यामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांनी अशा गुन्हेगारांना वेळेत वचक बसवावा अशी नागरिकातून मागणी होत आहे.



## उघडेवाडी ठाकूर बुवा येथे वीजपडून दोन जर्सी कालवडांचा मृत्यू

✔ **वेळापूर** : उघडेवाडी ठाकूर बुवा तालुका माळशिरस परिसरात रात्रींच्या सुमारास आलेल्या अचानक वेगवान वारे जोरदार पावसामुळे विजेचा कडकडाट होऊन येथे वीज कोसळून शेतकरी अशोक मुरलीधर उघडे यांची तीन वर्ष व दोन वर्षाची दोन कालवडे मृत्युमुखी पडली आहेत. त्या शेतकऱ्याचे १ लाख २० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. सदर घटनेचा पंचनामा उघडेवाडी तलाठी पोगुलवार, उघडेवाडी ग्रामपंचायत ग्रामविकास अधिकारी ठवरे, पशुवैद्यकीय अधिकारी राजमाने आदींनी पंचनामा केला आहे. वेळापूर परिसरात विजेच्या कडकडाटासह पडलेल्या पावसाने अनेक शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे.

## काँग्रेसची महूद(बु) येथे जय भारत सत्याग्रह सभा

✔ **सांगोला** : राहुल गांधी यांची खासदारकी चुकीच्या पद्धतीने रद्द केल्याच्या निषेधार्थ सांगोला तालुका काँग्रेस पक्षाच्या वतीने महूद बु येथे जय भारत सत्याग्रह सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी जिल्हाध्यक्ष डॉ. धवलसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते भीमनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहर घालून रॅली ची सुरवात झाली. यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष डॉ. धवलसिंह मोहिते- पाटील म्हणाले की, देशामध्ये लोकशाही संपविण्याचे काम मोदी सरकार करत आहे. राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रे मुळे सर्वासामान्य लोकांची चळवळ उभी राहत असून यामुळे देशात परिवर्तन होणार याची भीती वाटू लागल्याने नरेंद्र मोदी सरकार ने जाणीवपूर्वक राहुल गांधी यांची खासदारकी रद्द केली आहे. परंतु देशातील महागाई आणी अत्याचाराने त्रस्त झालेली जनता देशात परिवर्तन केल्याशिवाय राहणार नाही असे मत जिल्हाध्यक्ष धवलसिंह मोहिते- पाटील यांनी व्यक्त केले. यावेळी प्रदेश प्रवक्ते काकासाहेब कुलकर्णी, वरिष्ठ उपाध्यक्ष विजयकुमार हात्तुरे,जिल्हा महिला उपाध्यक्ष मैनाताई बनसोडे,शहराध्यक्ष तोहींद मुल्ला यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास जिल्हा उपाध्यक्ष आण्णासाहेब इनामदार, जिल्हा उपाध्यक्ष रवींद्र कांबळे ,महिला तालुका अध्यक्ष सुमित्रा ताई लोहार, महात्मा फुले सूतगिरणी संचालक अभिजीत कांबळे,मागासवर्गीय सेल तालुकाध्यक्ष रणजित महापुरे, रेखा कांबळे, सिद्धेश्वर देशमुख,दादासो कांबळे,संतोष पवार,सुनील कांबळे, पुण्यवंत साठे, रोहित कारले यांच्यासह मोठ्या संख्येने महिला व कार्यकर्ते उपस्थित होते.



## सनराइज इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये ग्रॅज्युएशन सेरेमनी

✔ **टेंभुर्णी** : टेंभुर्णीतील सनराइज् इंग्लिश मीडियम स्कूलच्या प्री-प्रायमरी विभागाचा ग्रॅज्युएशन सेरेमनी उत्साहात झाली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून प्री-प्रायमरी मधील विद्यार्थ्यांचे सर्व पालक उपस्थित होते. पूर्व प्राथमिक वर्गाचा अभ्यासक्रम पूर्ण करून प्राथमिक वर्गात जाणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याकरिता ग्रॅज्युएशन सेरेमनी आयोजित करण्यात आली होती. कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीकरिता प्रोत्साहित करणे हा होता. पाठांतरावर भर न देता विद्यार्थ्यांची विचार क्षमता कशी वृद्धिंगत करता येईल याचाही विचार यामध्ये केला जातो. शिकविण्याची उत्कृष्ट पद्धती व अशा प्रकारच्या नावीन्यपूर्ण उपक्रमांमुळे सनराइज इंग्लिश मीडियम स्कूल नेहमीच अग्रस्थानी राहिले आहे. याच कार्यक्रमांमध्ये काही विद्यार्थ्यांना स्टुडन्ट ऑफ द इयर हा सन्मान देण्यात आला. सर्व पालकांनी व विचार मंचावर उपस्थित असणारे माऊली शिक्षण संस्थेचे चेअरमन माननीय योगेशजी बोबडे तसेच सचिवा सुरजा बोबडे, सनराइज् इंग्लिश मधून स्कूलचे प्राचार्य गणेश पालवे व प्री-प्रायमरी विभाग प्रमुख सोनम काळे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## सावता महाराज यांचा आज चंदनउटी सोहळा

✔ **मोडनिंब** : सोमवार दि.१७ एप्रिल रोजी अरण येथे संत शिरोमणी सावता महाराज यांच्या समाधीस चंदन उटी लावण्याचा चंदन उटी सोहळा होत आहे . या सोहळयासाठी संत सावता महाराज भक्त मंडळी, सावता परिषदेचे पदाधिकारी तसेच माळी समाज बांधवानी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे अवाहन सावता परिषदेचे सोलापूर जिल्हाध्यक्ष मृदुल माळी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे. पत्रकात म्हटले आहे की, चंदन उटीच्या औचित्यावर सावता परिषदेच्या वतीने प्रत्येक वर्षी राज्यव्यापी मेळाव्याचे आयोजन करण्यात येत असते.

यावर्षी दि.१७ एप्रिल रोजी स्वामी नामानंद महाराज सेवाश्रम, पंढरपूरचे मठाधिपती ह. भ. प. दयाघन महाराज यांचे संतशिरोमणी सावता महाराज यांच्या जीवन चरित्रावर आधारित हरी कीर्तन व भक्त मेळा आयोजित करण्यात आला आहे. याप्रसंगी सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याणराव आखाडे, प्रदेशाध्यक्ष मयूर वैद्य यांच्यासह सावता परिषदेचे पदाधिकारी तसेच सर्व जिल्हाध्यक्ष व सावता परिषद सदस्य, व भक्तगण उपस्थित राहणार आहे. तरी या कार्यक्रमासाठी सोलापूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त जणांनी उपस्थित रहावे असे श्री मृदुल माळी यांनी केले आहे.

सुराज्य सोलापूर
Classified
पाहिजेत
गरजुंना कायमची कामाची व राहण्याखाण्याची सोय, लॉजमध्ये कायम राहणास कामगार पाहिजेत.
मो.9373980171
(190423)

## ज्यांना मार्केट कमिटी कळत नाही; त्यांनी ज्ञान पाजळू नये

### ▶▶ परमशेट्टी यांच्या आरोपाला शंकर म्हेत्रे यांचे उत्तर

✔ सुराज्य/अक्कलकोट



ज्यांना मार्केट कमिटी म्हणजे काय? या प्रश्नाचे उत्तर संपूर्ण आयुष्यभर कळले नाही.अशांनी चुकीच्या गोष्टी सांगुन मतदारांची दिशाभूल करू नये.चुकीचे ज्ञान हे घातक असुन ते इतरांना पाजळु नये असा आरोप काँग्रेसचे तालुकाध्यक्ष शंकर म्हेत्रे यांनी केला.

अक्कलकोट व दुधनी मार्केट कमिटीच्या निवडणुकीचा रणसंग्राम सुरू झाला असून सत्ताधारी व विरोधक यांच्यामध्ये शाब्दिक युद्ध चांगलेच रंगले आहे.शुक्रवारी शंकर म्हेत्रे यांनी विरोधकांवर टीका केली होती. यानंतर दुधनीचे भाजप शहराध्यक्ष अप्पु परमशेट्टी यांनी देखील दुधनीची मार्केट कमिटी ही म्हेत्रेंची प्रायवेट कंपनी झाल्याचा आरोप केला.याला उत्तर देताना शंकर म्हेत्रे बोलत होते.ते म्हणाले की,मार्केट कमिटी म्हणजे शेतकऱ्यांचे मंदिर आहे.

दुधनी व नागणसुर मार्केट कमिटीची निर्मीती ही तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी सोयीची ठरली आहे. याउलट विरोधकांनी अक्कलकोटच्या मार्केट कमिटीची दुरावस्था केली आहे.मोठा भ्रष्टाचार झाला असुन याचे पुरावे मतदारांसमोर आणणार आहे. परमशेट्टी यांना मार्केट कमिटीच्या आवारातील व्यवहार, प्रक्रिया याबाबतीत शुन्य ज्ञान आहे. त्यांचे बोलणे म्हणजे जगातील आठवा आश्चर्य असल्याचा घणाघात शंकर म्हेत्रे यांनी केला.

### दुधनीचे बिनविरोध मग अक्कलकोटचे का नाही?

परमशेट्टी यांनी दुधनी मार्केट कमिटीबाबत केलेले विधान हास्यास्पद आहे. व्यापार,शेतकरी,हमाल-तोलार आदींचे हित न साधता म्हेत्रे यांनी स्वतःचे हित साधल्याचा आरोप केला होता.दुधनीत आम्ही सर्वांचेच हित जोपासतो.म्हणुनच याची जाणीव ठेऊन दुधनीतील व्यापाऱ्यांनी निवडणूक बिनविरोध केली.अक्कलकोटला व्यापारी नाराज आहेत म्हणून तिथे निवडणूकीसाठी भरपूर लोकांनी अर्ज केले आहेत. दुधनी बिनविरोध मग अक्कलकोटचे व्यापारी बिनविरोध का केले नसावेत? या प्रश्नाचे उत्तर विरोधकांनी द्यावे असे शंकर म्हेत्रे म्हणाले.

## कुसमोड परिसरात अवकाळी पावसामुळे फळबागांचे नुकसान

✔ सुराज्य/पिलीव

माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथे गेलया दोन दिवसापासून वादळी, वारा व गारासह जोरदार अवकाळी पाऊस झाला आहे. यामुळे द्राक्षे, केळी, पप ई,डाळींब, आंबा, मका, कडवळ, कलींगड याचे अतोनात नुकसान झाले आहे. १४ व १५ एप्रिल अशया सलग दोन दिवस जोरदार वादळी वारा,विजांचा कडकडाट व गारांचा पाऊस झाल्यामुळे पिके, फळबागा जमीनदोस्त झाल्या आहेत.

यामुळे ऐन उन्हाळायात कमी पाणी असताना कसरत करुन जगवलेली पिके व फळबागांचे या अवकाळी पावसामुळे नुकसान झाले आहे. या पावसामध्ये बऱ्याच शेतकऱ्यांनची पत्रा शेड वाऱ्याने उडुन गेली आहेत. तर सध्या आंबा बहरात आहे. यामध्ये सर्वांत जास्त नुकसान झाले आहे. या अवकाळी पावसात चार ठिकाणी विजा पडल्या परंतु सुदैवाने यामध्ये जिवितहानी झाली नाही. या अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची माहीती माळशिरस तालुक्याचे आमदार रामभाऊ सातपुते यांना सांगीतले असता त्यांनी प्रशासनाला नुकसानीचे पंचनामे तत्काळ करण्याचे आदेश दिले असुन पंचनामे सुरु झाले आहेत. गारपीट व अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करुन ताबडतोब मदत देणयाची मागणी कुसमोडचे माजी सरपंच तुषार लवटे, माजी उपसरपंच संजय पाटील, ग्रामपंचायत सदस्य महावीर धायगुडे, मनोहर लवटे, लक्ष्मण पवार,शहाजी लेंगरे, यांनी मागणी केली आहे.

## साळुंखे कुटुंबियांना आपुलकी प्रतिष्ठानकडून मदतीचा हात

✔ सुराज्य/सांगोला

राहती घरे जळून खाक झाल्यामुळे उघड्यावर आलेल्या धुमाळ वस्ती येथील साळुंखे कुटुंबियांना आपुलकी प्रतिष्ठानने सामाजिक बांधिलकी जपत मदतीचा हात दिला आहे. संभाजी मसु साळुंखे व संजय संभाजी साळुंखे व विजय संभाजी साळुंखे राहणार धुमाळ वस्ती जवळा यांचे राहत्या घरी आग लागून त्यांची घरे पूर्णपणे जळून खाक झाली. साळुंखे कुटुंबीय दररोज रोजंदारीवर जातात. अतिशय गरीब असलेल्या या कुटुंबातील लोक हे गुरुवारी नेहमीप्रमाणे रोजंदारीने कामाला गेले होते, यावेळी अचानक घराला आग लागल्याने ही दुर्दैवी घटना घडली. या आगीमध्ये घरातील सर्व संसारोपयोगी साहित्य जळून खाक झाल्यामुळे तीनही कुटुंबे उघड्यावर आल्याचे समजल्यानंतर आपुलकी प्रतिष्ठानकडून त्यांना टॉवेल, चादर, सतरंजी, लहान मुलांना कपडे तसेच १ महिना पुरेल असा सर्व किराणा माल देऊन आपुलकी जोपासली आहे.

यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र यादव, सचिव संतोष महिमकर, प्रभाकर सरगर, प्रमोद दौंडे, इंजि. विकास देशपांडे, उमेश चांडोले, सुनिल मारडे, अमर कुलकर्णी आदिंसह सामाजिक कार्यकर्ते रमेश साळुंखे, व संभाजी साळुंखे यांच्या परिवारातील सदस्य उपस्थित होते.

## चांदापुरी येथील बेपता मुलाचा महुदजवळ आढळला मृतदेह

✔ सुराज्य/पिलीव

माळशिरस तालुक्यातील चांदापुरी येथील सरफराज नाशीक पठाण (वय ७) या मुलाचा महुदनजिक मृतदेह आढळला आहे.

मुलगा १३ एप्रिल रोजी आपल्या घरुन मित्रा कडे सायकल खेळणयासाठी जातो म्हणून गेला तो परत आलाच नाही. मग घरातील लोकानी त्याचा नातेवाईक, मित्र यांच्याकडे शोध घेतला परंतु त्याचा शोध लागलाच नाही. नंतर पिलीव पोलीस ठाण्यात हरविल्याची तक्रार दाखल केली आहे. १४ एप्रिल रोजी महुद तालुका सांगोला येथील पवारवाडी गावाजवळील निरा उजव्या कनालमधये धुळा कोळेकर यांना तरंगताना दिसला. त्यांनी पिलीव येथील नानासाहेब मदने यांना त्यांनी त्या मुलाचा फोटो पाठविला. तो सदरचा फोटो नातेवाईकांना पाठविला असता तो फोटो सरफराज पठाण याचाच असल्याची खात्री पटली .सरफराज हा सायकल खेळणयासाठी म्हणून गेला तो परत आलाच नाही त्याचा दुर्दैवी मृत्यू कसा झाला याची चर्चा सध्या चांदापुरी परीसरात सुरु आहे.

## सायकल बँकेमुळे विद्यार्थ्यांचा त्रास कमी : जावीर

✔ सुराज्य/चिखली

विद्यार्थ्यांना सायकल वाटप हा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ दिलीप स्वामी यांनी घालून दिलेला सामाजिक उपक्रम मोहोळ तालुक्यातील कोन्हेरी येथील जिल्हा परिषद शाळेने राबवून जिल्ह्यातील इतर शाळेसमोर आदर्श ठेवला आहे. या उपक्रमामुळे वाड्या वस्तीवरून शाळेसाठी येणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थिनींचा त्रास कमी झाला आहे.

विद्यार्थ्यांना हाताळण्यासाठी शाळेतील साहित्य द्या त्याशिवायही मुलांच्या ज्ञानात सुध्दा भर पडणार नाही असे प्रतिपादन जिल्हा परिषद शिक्षण विभाग प्रमुख संजय जावीर यांनी कोन्हेरी येथील जिल्हा परिषद शाळेने १७ सायकलींचे विद्यार्थ्यांना जावीर यांच्या हस्ते वाटप केले.

त्यावेळी ते मार्गदर्शन करताना बोलत होते .



एवढेच नव्हे तर माझ्या पगारातूनही दोन सायकलींची भर घालतो असे आश्वासन त्यांनी दिले.

तसेच कोन्हेरी शाळेची माजी विद्यार्थिनी राजश्री गुंड व त्यांचे पती सदानंद कसल्लु यांनी देखील पिंपरी चिंचवड येथील एन आय बी एम या कंपनीचा पाच लाख रुपयाचा सीएसआर फंड शाळेला मिळवून दिला. संगणक संच, एलईडी हे साहित्यही शाळेला दिले. ग्लोबल टीचर रणजीतसिंह डिसले यांनी ही शाळेला इंटरॅक्टिव्ह पॅनल बोर्ड व ६५ इंची दूरचित्रवाणी संच दिला आहे . जिल्हा परिषदेत कडूनही शाळेतील प्रयोगशाळे साठी पाच लाखांचा निधी उपलब्ध झाला असल्याचे मुख्याध्यापक पद्मावती डुबल यांनी सांगितले. यावेळी गटशिक्षणाधिकारी मल्लिनाथ स्वामी, केंद्रप्रमुख श्रीकांत खताळ, विस्तार अधिकारी विकास यादव यांच्यासह सरपंच, उपसरपंच, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व सदस्य, ग्रामस्थ, शिक्षक वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शेतकऱ्याचा मुलगा पहिल्याच प्रयत्नात झाला कृषी अधिकारी

✔ सुराज्य/वेळापूर

उच्च ध्येयापर्यंत पोहचण्यासाठी जिद्द,चिकाटी आणि अभ्यासातील सातत्य हीच यशाची गुरुकिल्ली आहे.यालाच अनुसरून अशक्य ते शक्य करण्याची किमया बोंडले (ता.माळशिरस) येथील संग्राम रामचंद्र जाधव या शेतकरी मुलाने करून दाखविली आहे.महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात आलेल्या परीक्षेत त्यांनी पहिल्याच प्रयत्नात तालुका कृषी अधिकारी पदास गवसणी घातली आहे.

महाराष्ट्र कृषी सेवा अंतर्गत पदांची भरती करण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने सन २०२१ मध्ये कृषी सेवा मुख्य परिक्षा व नुकत्याच मुलाखती घेण्यात आल्या होत्या.याप्रमाणे आयोगातर्फे जाहीर करण्यात आलेल्या पात्र उमेदवारांच्या यादीत संग्राम जाधव याने ४६ वी रँक मिळविली आहे.

### शासन व शेतकरी यांचा दुवा म्हणून काम करणार



मी एका शेतकऱ्याचा मुलगा आहे.याप्रमाणे मी शेतकर्यांचे कष्ट, यातना जवळून पाहिल्या व अनुभवल्या आहेत. शेती, शेतकरी व कृषी अधिकारी यांचा संबंध फार जवळचा आहे. यामुळे मी या पदावरून काम करीत असताना शासन व शेतकरी यांच्यातील दुवा म्हणून केले जाईल.

**-संग्राम जाधव**

शेतकरी कुटुंबातील पार्श्वभूमी असलेल्या संग्राम जाधव यांचे प्राथमिक शिक्षण गावातील जिल्हा परिषद शाळेतून तर माध्यमिक शिक्षण संत तुकाराम विद्यालयात झाले.अभ्यासात हुशार असलेल्या संग्राम जाधव यांनी गावाकडे असलेल्या शेती आणि शेतातील कामांमुळे शिक्षणात येणारा अडथळा पाहून लागलीच त्यांनी शिक्षणासाठी मामाचे गाव गाठले.खटाव तालुक्यातील (जि.सातारा) जायगाव या मामाच्या गावी असलेल्या यशवंतराव चव्हाण हायस्कूल मध्ये त्यांनी उच्च माध्यमिक शिक्षण घेतले.या ठिकाणी मुख्याध्यापक असलेले संग्राम चे मामा अशोकराव देशमुख यांचे त्याला बहुमोल मार्गदर्शन मिळाले.याचवेळी त्याचा शिक्षणाचा पाया भक्कम झाला आणि उच्च शिक्षणासाठी बाहेर पडला.बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या महाविद्यालयात त्याने विज्ञान शाखेतून बारावी उत्तीर्ण केली.कराड येथील दादासाहेब मोकाशी कृषी महाविद्यालयातून पदवी तर डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातून (वनस्पती योगशास्त्र) पदव्युत्तर पदवीचे शिक्षण सहजतेने पुर्ण केले.

हे सर्व करत असताना लहानपणी अधिकारी होण्याचे पाहिलेल्या स्वप्नांनी संग्रामला मात्र स्वस्थ बसू दिले नाही. एका बाजूला शैक्षणिक अभ्यास तर दुसर्या बाजूला स्पर्धा परिक्षेचा अभ्यास ते करतच राहिले.संग्राम ने शालेय जीवनात अविरत केलेल्या कष्टाचे फळ अखेर त्याला मिळाले.पहिल्याच प्रयत्नात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत त्यांच्याकडून कृषी अधिकारी पदास गवसणी घालण्यात आली.

### आई -वडिलांच्या कष्टाला यश

आपल्या मुलाने पाहिलेले अधिकारी होण्याचे स्वप्न व त्या स्वप्नांना बळ देण्याचे काम वडिल रामचंद्र जाधव व आई मनिषा जाधव यांनी केले.शेतात काम करताना मुलं मोठी होतील हाताखाली येतील ही आशा दूर ठेवून ते काम करीत आहेत.शेती शिवाय दुसरा कोणताही उत्पन्नाचा स्रोत नसलेल्या या जाधव दाम्पत्याने हाती आलेल्या धानाच्या उत्पन्नावर संग्रामला तर अधिकारी केलेच केले पण दुसरा मुलगा संकेत याला ही संग्रामच्या पावलावर पाऊल ठेवण्यास पाठबळ देत आहेत.एकूणच आई वडिलांच्या कष्टाला यश मिळत असल्याचे पाहून त्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला आहे.

### गावाला मिळाला पहिला अधिकारी

पुणे -पंढरपूर पालखी मार्गावरील बोंडले हे ठिकाण महत्वाचे म्हणून ओळखले जाते.शेती आणि शेतीशी निगडित व्यवसाय हेच येथील शेतकर्यांचे उत्पन्नाचं साधन आहे.परंतू काळ बदलला येथील नवी पिढी उच्च शिक्षित होऊन वेगवेगळ्या क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवत आहेत.येथील संगणक अभियंत्यांनी तर साता समुद्रापार भरारी घेतली आहे.परंतू आजपर्यंत एमपीएससी तून शासकीय सेवेत अधिकारी न झाल्याचा खंत गावकऱ्यांना वाटत होती.ही खंत दूर करून संग्रामच्या रूपाने गावाला पहिला शासकीय अधिकारी मिळाला आहे.

# अंत:करणामध्ये सुविचार ठेवून त्या अनुरूप वर्तन करायला हवे : आप्पासाहेब धर्माधिकारी

सुराज्य/पुणे


**ज्येष्ठ निरुपणकार आप्पासाहेब धर्माधिकारी यांना रविवारी महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. नवी मुंबईतील खारघरमध्ये भव्य सोहळ्यात केंद्रीय गृहमंत्री अमित शाहा यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. यावेळी व्यापीठावर महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते.**

समाजसुधारकाच्या सन्मानसोहळयासाठी अलोट गर्दी, अमित शाहांच्या स्वागतासाठी जय्यत तयारी



यावेळी पुरस्कार प्रदान समारंभात आप्पासाहेब धर्माधिकारी म्हणाले की, 'पुरस्कार हा नेहमीच मोठा असतो, तो लहान कधीच नसतो. माझ्या कार्याची दखल घेऊन मला हा पुरस्कार दिला आहे. पण माझ्या मते कार्य श्रेष्ठ आहे आणि कार्याचा हा गौरव व्हायला पाहिजे. नानासाहेबांनी आज जे कष्ट केले आणि आपण सर्वांनी कष्ट केले आहेत, त्यामुळे मला हा पुरस्कार मिळत आहे. महाराष्ट्र सरकारने मला हा पुरस्कार दिला आहे, पण एका घरामध्ये पुन्हा हा पुरस्कार देणे अशी घटना महाराष्ट्रात याआधी झालेली नाही, असे आप्पासाहेब धर्माधिकारी म्हणाले.'

त्यांनी सांगितले की, 'ज्या वेळेला १९४३ सालापासून नानासाहेबांनी



कार्य सुरू केले. त्यावेळेला त्यांनी खेडेगावापासून सुरूवात केली. काही जणांनी त्यांना सांगितले की, 'तुम्ही खेडेगावामध्ये नको शहरामध्ये जा. पण नानांनी त्यांना सांगितले की, शहरामध्ये जाण्याची आवश्यकता नाही आहे. कारण

## एकाच कुटुंबाच्या तीन पिढ्या समाजसेवेचा संस्कार जपताना पहिल्यांदा पाहिले : अमित शाह

पद्मश्री आप्पासाहेब धर्माधिकारी यांना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते रविवारी महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. नवी मुंबईतील खारघरच्या सेंट्रल पार्क मैदानात हा भव्य पुरस्कार सोहळा पार पडलाय. जवळपास ४०० एकरचे हे मैदान श्री सदस्यांच्या गर्दीने भरलेला आहे. यावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या कार्याचे कौतुक करताना हे उद्गार काढले.



## पुरस्काराची रक्कम मुख्यमंत्री सहाय्यता निधीला

ज्येष्ठ निरुपणकार आप्पासाहेब धर्माधिकारी यांना रविवारी (१६ एप्रिल) राज्य सरकारचा सर्वोच्च नागरी सन्मान अर्थात 'महाराष्ट्र भूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं. यावेळी आप्पासाहेब धर्माधिकारी यांनी श्वास सुरू असेपर्यंच हे काम असंच सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला. या पुरस्कार सोहळयासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह उपस्थित होते. अमित शाह आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आप्पासाहेबांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही यावेळी उपस्थित होते. तसेच महाराष्ट्राच्या कॅबिनेटमधील अनेक मंत्री, आमदार आणि भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी या सोहळयाला हजेरी लावली. हा पुरस्कार वितरण सोहळा पाहण्यासाठी राज्यभरातून लाखो लोकांचा जनसमुदाय खारघरच्या मैदानात दाखल झाला होता. दरम्यान, आप्पासाहेबांनी पुरस्कारासह मिळालेली २५ लाख रुपये ही रक्कम मुख्यमंत्री सहाय्यता निधीला दान केली आहे. या पुरस्कारासाठी योग्य व्यक्तींची निवड ही सरकारने नियुक्त केलेल्या समितीद्वारे केली जाते. या पुरस्कारात २५ लाख रुपये रोख, स्मृतिचिन्ह आणि प्रशस्तीपत्र दिलं जातं.

खेडेगावामधल्या लोकांना श्रद्धा, रितीरिवाज आणि वागणुकीचे चांगले उत्तम असे वळण लागायला पाहिजे आणि यासाठी त्यांनी अंत:करणामध्ये सुविचार ठेवून त्या अनुरूप प्रत्येकाला वर्तन करता यायला हवे, त्यामुळे श्री सदस्यांची सुरुवात खेडेगावामधून केली आहे, असे आप्पासाहेब धर्माधिकारी यांनी सांगितले.'

श्री सदस्यांची सुरूवात झाल्यानंतर कोणत्याही प्रकारची जाहिरातबाजी नाही. मी महत्त्वाच्या ठिकाणी जात असतो, मात्र पुष्कळ ठिकाणी मी जात नाही. प्रसिद्धी या विषयापासून मी लांब आहे. प्रसिद्धीमुळे काहीही प्राप्त होत नाही. प्रसिद्धी करावी लागते किंवा जाहिरात करावी लागते याचा अर्थ ती वस्तू किंवा तो पदार्थ संपत नाही, असे आप्पासाहेब धर्माधिकारी म्हणाले. त्यांनी सांगितले की, 'आज प्रत्येक माणसाला वस्तूची आवश्यकता आहे. ही रुजू व्हायला पाहिजे. त्यासाठीच आमचा खटाटोप आहे.

नानासाहेबांनी आयुष्य असेपर्यंत वयाच्या ८७ वर्षांपर्यंत कार्य केले. मी सुद्धा

## राजकीय सत्तेपेक्षा आध्यात्मिक शक्ती मोठी असते : मुख्यमंत्री

'राजकीय सत्तेपेक्षा आध्यात्मिक शक्ती मोठी असते, त्याचे स्वरूप या ठिकाणी आपण पाहतोय. राजकीय आध्यात्मिक अधिष्ठानाची जोड, आशीर्वाद आणि प्रेरणा या ठिकाणी लागते त्याचा जिवंत उदाहरण या ठिकाणी आपण पाहतो आहे, असे मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. ही गर्दी सगळे रेकॉर्ड मोडणारी असून याचे रेकॉर्ड मोडायचा असेल तर ते फक्त आणि फक्त आप्पा साहेबांचे श्री सदस्यच मोडू शकतात, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. या अथांग जनसागरामध्ये आप्पासाहेबांच्या रूपाने देव दिसतोय. नानासाहेबांना देखील महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर झाला होता पण त्यांच्या निधनानंतर याच मैदानामध्ये आप्पासाहेबांनी स्वीकारला होता आणि त्याच मैदानामध्ये रविवारी पुन्हा २०२२ चा महाराष्ट्र भूषण आप्पासाहेबांना देण्यात आला हा योगायोग आहे, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी सांगितले.'




आवश्यकता यासाठी आहे की, मानवता धर्मामध्ये प्रत्येक मनुष्याने उभ राहावं आणि मानवता हा धर्म सगळ्यामध्ये श्रेष्ठ आहे. हा मानवता धर्म प्रत्येकाच्या आयुष्यामध्ये माझा श्वास असेपर्यंत हे कार्य करत राहणार आहे. माझ्यानंतर माझा मुलगा सचिन धर्माधिकारी सुद्धा चांगले काम करेन, असे आप्पासाहेब धर्माधिकारी यांनी सांगितले.

ते म्हणाले की, 'काम उत्तम असेल तर सन्मान होतोच, त्यामुळे हा पुरस्कार नानांच्या आणि आपल्या सर्वांच्या चरणी समर्पित आहे.

आप्पासाहेब धर्माधिकारी म्हणाले की, 'समाजसेवा सर्वात श्रेष्ठ आहे. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान मी उभं केलं आहे. त्यामार्फत मी काम करताना प्रत्येकाला वृक्षारोपण करायला सांगतो आणि प्रत्येकाने पाच झाडे लावावी. मानवाने सदृढ आयुष्य जगावे यासाठी आरोग्य शिबीर, रक्तदान शिबीर प्रतिष्ठानच्या माध्यमातून घेतले जाते. यामुळे कोणाला रक्ताची गरज असले त्याला मदत होईल आणि दुसऱ्याचे जीवन त्यामुळे वाचेल. आपण सेवा म्हणून काम केले पाहिजे. अखेरच्या श्वासापर्यंत मी समाजसेवेच काम सुरु ठेवणार असल्याचे आप्पासाहेब धर्माधिकारी म्हणाले.

त्यांनी सांगितले की, 'पाणी असूनसुद्धा ते विकत घ्यावे लागते, त्यामुळे नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या माध्यमातून पाणपोई उभ्या केल्या आहेत. ठिकठिकाणी बस थांबे तयार करत आहोत. तसेच जलसंधारणाचे काम देखील आपण करत आहोत. पाणी वाचवण्याचे काम आपण केलं पाहिजे, असे आप्पासाहेब धर्माधिकारी म्हणाले. स्वच्छ भारत करण्यासाठी आणखी काम केले पाहिजे. मानवता धर्म सर्वात श्रेष्ठ आहे. त्यामुळे ज्या ज्या ठिकाणी नुकसान होते, त्या-त्या ठिकाणी प्रतिष्ठानच्यावतीने मदत करण्याचे आम्ही काम करतो. पण हे काम आणखी वाढले पाहिजे, असे आप्पासाहेब धर्माधिकारी यांनी या पुरस्कार सोहळ्यात वक्तव्य केले.

## भरदिवसा भाजप कामगार आघाडीच्या शहराध्यक्षावर गोळीबार

**नाशिक** : एकेकाळी धार्मिक शहराची ओळख असलेल्या नाशिकमध्ये आता गुन्हेगारीने डोके वर काढण्यास सुरुवात केली आहे. महिनाभराच्या अंतराने नाशिकमध्ये पुन्हा एकदा गोळीबार झाल्याची घटना समोर आली आहे.

शहरातील अंबड पोलीस ठाणे हद्दीत असलेल्या बाजीप्रभू चौकात भाजप कामगार आघाडीच्या शहराध्यक्षावर अज्ञातांनी गोळीबार केल्याची घटना घडली आहे. या गोळीबाराच्या घटनेत भाजप पदाधिकारी राकेश कोष्टी जखमी झाले आहेत. या घटनेने नाशिक शहरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. या घटनेची माहिती मिळतातच वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या पथकासह अंबड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी करून पुढील कारवाईला सुरुवात केली आहे.

## 'कुशल रोहयो'मध्ये १० कोटींचा गैरव्यवहार

सुराज्य/संभाजीनगर

**कुशल रोजगार हमी योजनेत फुलंब्री आणि सिल्लोड तालुक्यात एकूण ७३ रस्त्यांची कामे मंजूर असताना, या रस्त्यांची कामे न करता दहा कोटी सात लाख रुपयांचा घोटाळा केल्याचा प्रकार समोर आला आहे. हा घोटाळा २००९ ते २०१६ या काळात करण्यात आला आहे. या प्रकरणात आठ अभियंत्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**




या प्रकरणी सार्वजनिक विभागाचे शाखा अभियंता के. एस. गाडेकर, उपविभागीय अभियंता एम. एम. कोल्हे, शाखा अभियंता बी. बी. जायभाये, शाखा अभियंता आर. जी. दिवेकर, सेवानिवृत्त शाखा अभियंता ए. एफ. राजपूत, शाखा अभियंता नागदिवे यांच्या विरोधात सिटी चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील नायब तहसीलदार राजेंद्र विठ्ठलराव शिंदे यांनी सिटी चौक पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, वर्ष २००९ ते २०१६ या दरम्यान फुलंब्री तालुक्यातील विविध गावातील कुशल रोजगार हमी योजना अंतर्गत एकूण ४२ रस्त्यांसाठी पाच कोटी ५० लाख ४६ हजार रुपयांची कामे मंजूर करण्यात आली होती.

सिल्लोड तालुक्यातील कुशल रोहयो योजनेत ३१ रस्त्यांसाठी चार कोटी ५६ लाख ५४ हजार रूपये मंजूर करण्यात आले. या दोन तालुक्यासाठी दहा कोटी सात लाख रुपये मंजूर झाले होते.

## राज्यात सव्वातीन महिन्यात दीड कोटींची लाच

**नागपूर** : राज्यात सव्वातीन महिन्यात तब्बल दीड कोटींची लाच घेण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. जानेवारी ते १२ एप्रिल यादरम्यान लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) २५३ सापळे रचून ३६१ लाचखोरांना रंगेहाथ पकडले. नागपुरात विभागाने २९ कारवाया करून ३२ लाचखोरांना अटक केली.

एसीबीच्या आकडेवारीनुसार, सर्वाधिक कारवाया पुणे विभागांतर्गत करण्यात आल्या. तेथे ४९ सापळ्यांमध्ये ७१ लाचखोर अडकले. दुसऱ्या क्रमांकावर नाशिक आहे. येथे ४८ सापळा कारवायांमध्ये ७४ जणांना एसीबीने पकडले. मुंबईत १२ कारवायांत १४, ठाण्यात ३२ कारवायांत ४५, अमरावतीत २२ कारवायांत ३२, औरंगाबादेत ४३ कारवायांत ६० तर नांदेडमध्ये १८ कारवायांत २२ जणांना एसीबी कोठडीची हवा खावी लागली.

## 'सोशल' बदनामीच्या पाच हजार तक्रारी

**पुणे** : सोशल मीडियाद्वारे फसवणुकीच्या पाच हजार तक्रारी गेल्या दीड वर्षांत शहरात दाखल झाल्या आहेत. समाजमाध्यमांद्वारे मैत्री करून अश्लील फोटो आणि व्हिडिओ पसरवण्याची भीती दाखवून खंडणीसाठी धमकावण्याच्या प्रकारातही दुपटीने वाढ झाली आहे. राजकीय फायद्यासाठी सोशल मीडियाद्वारे फसवणूक आणि बदनामी करण्याचे प्रकार वाढले आहेत. त्याच वेळी सामान्य माणसांनाही या गैरप्रकारांचा फटका बसत आहे. सायबर पोलिसांकडे २०२२अखेरपर्यंत 'सेक्सटॉर्शन'च्या एक हजार ४५८ तक्रारी नोंदविण्यात आल्या आहेत. २०२१मध्ये अशा प्रकारच्या ६८२ तक्रारी दाखल झाल्या होत्या. चालू वर्षांतही 'सेक्सटॉर्शन'चे काही गुन्हे उघडकीस आले आहेत. सोशल मीडियाद्वारे फसवणूक आणि बदनामी करण्याच्या तीन हजारपेक्षा अधिक घटना मागील वर्षभरात घडल्या. या प्रकारांना आळा घालण्यासाठी पीडित लोकांनी तक्रार दाखल करण्यासाठी त्वरित पुढे यावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## आता मोबाइलवर कळणार जमिनींचे खटले

**पुणे** : महसूल, नोंदणी व मुद्रांक शुल्क आणि भूमी अभिलेख या तीन विभागांसाठी एकत्रित तयार झालेले 'ईक्यूजेकोर्ट ॲप व्हर्जन २' विकसित करण्यात येत आहे. त्यामुळे जमीनविषयक सर्व खटले, फेरफार नोंदींची माहिती आता नागरिकांना घरबसल्या मोबाइलवर पाहता येणार आहे. खरेदी-विक्रीपासून ते नावनोंदणीच्या प्रक्रिया सर्व ऑनलाइन पद्धतीने उपलब्ध होणार आहेत. खटल्याची सुनावणी कधी होणार, किती वाजता सुरू होईल यासाठी कार्यालयाबाहेर गर्दी होते. हे चित्र बदलण्यासाठी जमिनींच्या खटल्यांच्या सुनावणीसाठी ईक्यूजेकोर्ट लाइव्ह बोर्ड पुणे' असे ॲप महसूल विभागाकडून विकसित करण्यात आले आहे. या ॲपच्या माध्यमातून कोणत्याही खटल्याची सुनावणी आहे किंवा कोणत्या खटल्याची सुनावणी पुढे ढकलली गेली याची माहिती आता पक्षकारांसह वकिलांना मोबाइलवर मिळू लागली आहे.

## एकेकाळचे कट्टर मित्र बनले वैरी

**कोल्हापूर** : सतेज पाटलांना आमदार केलं, ही माझी आयुष्यातील सर्वांत मोठी चूक झाली, अशा शब्दात महादेवराव महाडिकांनी सतेज ऊर्फ बंटी पाटलांच्या आमदारकीचा इतिहास ताजा केला आहे. एकेकाळी सतेज पाटलांमागे ताकद लावून महादेवराव महाडिकांनी त्यांना आमदार केलं. मात्र, पुढे बदललेल्या राजकीय गणितांमुळं सतेज पाटलांनी महाडिकांनाच पराभूत केलं. महाडिकांच्या तालमीत तयार झालेल्या सतेज पाटलांनी आता महाडिक परिवाराच्या वर्चस्वाला पुरता सुरूंग लावण्याचं ठरवलंय. त्यातच राजाराम साखर कारखान्याच्या निवडणुकीमुळे पुन्हा एकदा पाटील-महाडिक गट आमनेसामने आलेत. कारखान्याच्या निवडणुकीत सतेज पाटलांनी कंडका पाडायचा निर्धार केलाय.

# अतीक अहमदला संपविणारा लवलेश कोण?

सुराज्य/प्रयागराज

**उत्तर प्रदेशमधील माफिया अतिक अहमद आणि त्याचा भाऊ अशरफ यांची शनिवारी प्रयागराज येथे गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. हातात बेड्या असताना प्रसारमाध्यमांशी बोलणाऱ्या या दोघांची तीन हल्लेखोरांनी हत्या केली. पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले असून त्याची ओळख पटली आहे. लवलेश तिवारी, सनी आणि अरुण मौर्य अशी आरोपींची नावे आहेत. अतीक आणि अशरफ यांच्यावर गोळ्या झाडल्यानंतर तिघांनी 'जय श्रीराम'च्या घोषणा दिल्या त्यानंतर स्वत:च पोलिसांसमोर सरेंडर केलं.**

अतीक अहमदवर हल्ला करण्यासाठी तिघे हल्लेखोर पत्रकार म्हणून घटनास्थळी आले. अतीक प्रसारमाध्यमांसमोर येताच तिघांनी त्यांच्यावर गोळ्या झाडण्यास सुरुवात केली. प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींच्या गराड्यातील दोघांनी अतिशय जवळून अतीक व अशरफवर गोळ्या झाडल्या. गोळीबारात दोघेही रक्तबंबाळ होत जमिनीवर कोसळले व काही वेळातच त्यांनी प्राण सोडले. या घटनेनंतर पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतलं आहे. अतीक आणि अशरफच्या हत्येनंतर आरोपींनी पोलिसांना जबाब दिला आहे. अतीक अहमदचं पाकिस्तानसोबत लागेबंधे होते. त्याने व त्याच्या टोळीने अनेक निरापराधांचा जीव घेतला. अतीक जमीन बळकवण्यासाठी हत्या घडवून आणायचा तर त्याच्या विरोधात जबाब देणाऱ्यांनाही त्रास द्यायचा. त्याचा भाऊ अशरफदेखील असंच करायचा. म्हणूनच आम्ही दोघांची हत्या केली, असं आरोपींनी म्हटलं आहे.

सूत्रांनुसार, तिन्ही आरोपी वेगवेगळ्या जिल्ह्यात राहणारे आहेत. लवलेश तिवारी बांदा, सनी हमीरपूर आणि अरुण मौर्य कासगंज येथील मुळ रहिवाशी आहेत.

अतीकचे पाकिस्तानच्या एयएसआयशी व लश्कर-ए-तौयबासोबत संबंध होते, असा दावा आरोपींनी केला आहे. दरम्यान, अतिक अहमद हत्याकांडातील तिन्हे आरोपी वेगवेगळ्या जिल्ह्यातील आहेत. त्यामुळं त्यांची



आपापसात ओळख कशी झाली याचा तपास पोलीस करत आहेत. तिघांचे वय २० ते २५ वर्षांपर्यंत आहे.

विशेष म्हणजे, अतीक अहमदवर हल्ला केल्यानंतर तिघांपैकी कोणीच पळून जाण्याचा प्रयत्न केला नाही. याउलट त्यांच्यावर गोळ्या झाडल्यानंतर तिघांनी 'जय श्री राम'च्या घोषणा दिल्या आणि पोलिसांसमोर फिल्मी स्टाइलने सरेंडर केलं.



## पावनं ऽऽ रामराम

## काय म्हणतयं? पॉलिटिक्स

# नागरिक-लोकप्रतिनिधी-अधिकारी सारेच हैराण

## पाणी प्रश्नावरून महापालिकेत पेटले रान

**अजित उंब्रजकर**

**सोलापूर शहरात गेल्या महिनाभरापासून पाणीपुरवठा विस्कळीत झाला असून लवकरच हा पाणीपुरवठा सुरळीत होईल, असा महापालिकेचा दावा फोल ठरला आहे. त्यामुळे आता पाण्याच्या प्रश्नावरून सत्ताधाऱ्यांसह विरोधकही आक्रमक झाल्याचे दिसून येत आहे. प्रभागांमध्ये होत असलेला अनियमित पाणीपुरवठा, यामुळे नागरिकांना होणारा त्रास व नगरसेवकांवर ओढवणारी नाराजी सत्ताधारी आणि विरोधक दोघेही प्रशासकासमोर मांडत आहेत. गेल्या काही दिवसांपासून पालिकेसमोर मटका फोड आंदोलन सुरू आहे. एकंदरित पाणीपुरवठ्याच्या विषयाने नागरिकांनी लोकप्रतिनिधींना हैराण केले आहे तर लोकप्रतिनिधींनी अधिकाऱ्यांना हैराण केले आहे.**

उजनी धरणात पुरेसा पाणीसाठा उपलब्ध असतानाही शहरात पाणीटंचाई जाणवत आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून शहरात अवेळी आणि विस्कळीत पाणीपुरवठा होत आहे. काही भागात तर पाच ते सहा दिवसात पाणी येत आहे. या सर्व प्रकारामुळे नागरिक पुरते वैतागले आहेत. नागरिक सर्व राग लोकप्रतिनिधींवर काढताना दिसत आहेत. त्यामुळे आता सत्ताधाऱ्यांसह विरोधकांनीही आंदोलनाचे हत्यार उपसले आहे.

महापालिकवर गेल्या अनेक वर्षांपासून काँग्रेस आणि राष्ट्रवादीची सत्ता होती. सन २००० पासून शहराला एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरू झाला. त्यानंतर दोन, तीन आणि आता चार दिवसाआड पाणी पुरवठा सुरू आहे. आता महिनाभराच्या कालावधीत तर काही ठिकाणी आठवड्याला पाणी येत आहे. मागील टर्ममध्ये भाजपची महापालिकेवर सत्ता आली. निवडणूक जाहीरनाम्यात भाजपाने रोज पाणीपुरवठ्याचे आश्वासन दिले होते. मात्र ते पूर्णपणे फोल ठरले. त्यामुळे नागरिकांमधून भाजपबद्दल रोष आहे. अशातच आता भाजपने महापालिकेवर मटकाफोड आंदोलन केल्यामुळे तर काँग्रेससह विरोधी पक्षाने भाजपवर टिकेची झोड उठवली आहे. मध्यंतरी भाजपाचे माजी नगरसेवक सुरेश पाटील यांनी महापालिकेत मटका फोड आंदोलन केले होते. त्यानंतर काँग्रेसच्यावतीने आयुक्तांना निवेदन देऊन पाणीपुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली होती. याशिवाय चार माजी महिला महापौरांनाही आयुक्तांची भेट घेऊन पाणीपुरवठ्याचा प्रश्न सोडवण्याची मागणी केली होती. गेल्या दोन दिवसांपूर्वी भाजपच्या वतीने माजी नगरसेवक किरण देशमुख आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी महापालिकेत येऊन मटका फोड आंदोलन केले होते. दोन दिवसांपूर्वी माजी नगरसेवक आनंद शिंदे यांनीही माठ फोडत आंदोलन केले आणि लवकरात लवकर पाणीपुरवठा सुरळीत न केल्यास घागर मोर्चा काढण्याचा इशाराही दिला आहे. दुसरीकडे माजी नगरसेविका श्रीदेवी फुलारे यांनी थेट आयुक्तांना लक्ष करत उजनी धरणावर फोटोसेशन केल्याची टीका केली. एकंदरित विस्कळीत पाणीपुरवठ्याने नागरिकांनी लोकप्रतिनिधींना हैराण केले आहे तर लोकप्रतिनिधींनी अधिकाऱ्यांना हैराण केले आहे.





### प्रशासक असल्याने लोकप्रतिनिधींची अडचण

पाणी हा सोलापूकरांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. त्यामुळे पाणीपुरवठा विस्कळीत झाला की, नागरिकांचा पार चढतो. सध्या अशीच परिस्थिती आहे. त्यामुळे नागरिक लोकप्रतिधींना सतत फोन करून विचारत आहेत. मात्र सध्या पालिकेवर प्रशासक असल्यामुळे लोकप्रतिधींनाही काम करताना अडचणी येत आहेत. त्यामुळे लोकप्रतिनिधी आंदोलन करत आहेत. महापालिका निवडणुका कधीही होऊ शकतात, अशातच नागरिकांच्या रोषाचा फटका बसतो की काय अशी अवस्था लोकप्रतिनिधींची झाली आहे.

### प्रशासनाकडून प्रयत्न सुरू; मात्र यश नाही

महापालिकेकडून पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. बैठकावर बैठका सुरू आहेत. स्काडा प्रणालीचे काम पूर्ण झाले आहे. मात्र अद्याप पालिकेच्या प्रमुख अधिकाऱ्यांना यश मात्र मिळत नसल्याचे दिसून येत आहे. पाणी पुरवठा अधिकाऱ्यांमधील राजकारण मिटवले तर पाणीपुरवठा सुरळीत होईल, अशी चर्चा महापालिकेत कायम सुरू आहे. त्यामुळे आता आयुक्त यावर काय उपाययोजना करतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मोहिते-पाटलांना शह देण्यासाठी निंबाळकर यांची शिंदे बंधूंशी जवळिकता

**सूरज सरवदे**

**लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माढा लोकसभेचे खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांचे माढा मतदारसंघातील दौरे वाढले आहेत. मोहिते पाटील यांना शह देण्यासाठी आता खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी माढा आणि करमाळा विधानसभा मतदारसंघावर आपले लक्ष केंद्रित करून शिंदे बंधूंना भाजपात आणण्यासाठी प्रयत्न सुरू केल्याचे दिसत आहे.**









मागील लोकसभा निवडणुकीत रणजितसिंह मोहिते पाटील यांनी भाजपात प्रवेश केला होता. तत्कालीन माढा लोकसभेचे खासदार विजयसिंह मोहिते पाटील यांनी आपली जागा सोडून रणजितसिंह नाईक निंबाळकर यांना एक लाखापेक्षाही जास्त मताधिक्य माळशिरस विधानसभा मतदारसंघातून दिले होते. खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांना निवडून आणण्यात मोहिते पाटील यांचा सिंहाचा वाटा होता.

खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर आणि मोहिते पाटील यांच्यात नगरपंचायतीच्या निवडणुकीत वरून पक्षांतर्गत वाद सुरू झाला. तेव्हापासून मोहिते पाटील आणि नाईक निंबाळकर यांच्यामध्ये सुप्त संघर्ष पाहायला मिळत आहे. सोलापूर जिल्ह्यात आल्यानंतर रणजितसिंह नाईक निंबाळकर हे पहिल्यांदा शिवरत्नवर जायचे त्यानंतर ते मतदारसंघात दौरा करायचे. मात्र, अलीकडच्या काळात रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी शिवरत्न बंगल्यावर जाण्याचे टाळण्याचे दिसत आहे.

त्यातच मोहिते पाटील यांच्यातून आमदार रणजितसिंह मोहिते पाटील आणि भाजपचे जिल्हा सरचिटणीस धैर्यशील मोहिते पाटील यांनी हक्काच्या माढा लोकसभेची निवडणूक लढवणार असल्याची चर्चा सुरू आहे त्यामुळे मोहिते पाटील आणि नाईक निंबाळकर यांच्यातील संघर्ष हा कमी होताना दिसत नाही. त्यातच सोलापूर जिल्ह्यातील भाजपचे आमदार वाढवण्यासाठी मोहिते पाटलांचे पारंपारिक विरोधक आमदार शिंदे बंधूंना सोबत घेण्याची तयारी निंबाळकर यांनी केल्याचे दिसून येत आहे. त्यासाठी माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनदादा शिंदे तसेच त्यांचे जुने मित्र करमाळ्याचे आमदार संजयमामा शिंदे यांच्याशी जवळीकता वाढल्याचे दिसून येत आहे. आमदार बबनदादा शिंदे यांना यापूर्वी अंमलबजावणी संचलनाकडून अर्थात ईडीकडून चौकशीसाठी बोलवण्यात आले होते.

त्यानंतर रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी मध्यस्थी करत बबनदादा शिंदे आणि माजी आमदार राजन पाटील यांना दिल्लीवारी देखील घडवून आणली होती. दिल्लीवारीमध्ये ते देवेंद्र फडणवीस यांना भेटले होते. तेव्हापासून शिंदे बंधू भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याच्या चर्चा रंगल्या आहेत.

खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी मोहिते पाटलांना शह देण्यासाठी शिंदे बंधूंना भाजपात आणण्याच्या तयारीत असल्याचे दिसत आहे. शिंदे बंधूंना भाजपात घेतले तर जिल्ह्यातील भाजपाचे दोन आमदार वाढतील आणि त्याचबरोबर रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या खासदारकीचा मार्ग आणखीन सुखकर होईल, असे बोलले जात आहे.

# होऊन जाऊ द्या, दूध का दूध, पानी का पानी....

**निसार तांबोळी**

**सांगोला कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत १८ जागांसाठी १२७ उमेदवारांनी अर्ज दाखल केले असून अद्यापपर्यंत एकाही उमेदवारांनी माघार घेतली नाही. अर्ज माघार घेण्याची अंतिम मुदत २० एप्रिल असल्याने त्या तारखेकडे संपूर्ण सांगोला तालुक्याचे लक्ष लागले आहे.**

निवडणुकीत अर्ज भरणाऱ्यांमध्ये शेकाप- राष्ट्र राष्ट्रवादी -शिवसेना शिंदे गट- भाजपा- रिपाई -शेकाप बंडखोर ॲड. सचिन देशमुख गट- भाजप आलदर गट आधी दिग्गज उमेदवारांनी अर्ज दाखल केल्याने माघार घेतेवेळी शेकाप सोडून सर्व पक्षांची दमछाक होण्याची भीती असून घोडा बाजार होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. कृषी उत्पन्न बाजार समिती म्हणजे सोन्याची अंडी देणारी कोंबडी आहे. त्यामुळे सदर संस्थेवर आपल्या पक्षाची सत्ता यावी यासाठी शेकाप व शिवसेना शिंदे गट -राष्ट्रवादी युतीने कंबर कसली आहे परंतु सत्ता मिळणे दुरापास्त आहे. शेकापलाही पूर्वीप्रमाणे निवडणूक सोपी नसली तरी निवडणूक लढवण्याची कार्यकर्त्यांची इच्छा आहे.

### उत्सुकता शिगेला

शेकापची सध्या सावध भूमिका असून अद्याप पत्ते उघडले नाहीत. त्यांच्या पक्षातील बंडखोरीची लागण झाल्याने त्याकडे सर्व नेत्यांचे लक्ष लागले आहे तर राष्ट्रवादी पक्षाची भूमिका अद्याप स्पष्ट झाली नाही. आमदार शहाजी पाटील हे सातत्याने शरद पवारवर टीका करीत आहेत. आमदार पाटील व माजी आमदार साळुंखे पाटील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत एकत्र असल्याचे दिसत आहे. शेकाप राष्ट्रवादी काँग्रेस- शिवसेना शिंदे गट -भाजपा अशी आघाडी करतात का? शेकाप विरुद्ध आबा बापू आघाडी अशी लढत होणार यासाठी २० एप्रिल या तारखेची तालुक्यातील जनता वाट पाहत आहे.

विद्यमान आमदार शहाजी पाटील यांचे वारंवार वेगवेगळे मत व्यक्त केले जात असल्याने विधानसभा निवडणूक ऐवजी पंधरा दिवसावर आलेल्या कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत आमदार पाटील यांनी लढवून आपली ताकद दाखवावी. घोडा मैदान जवळ आहे अशा मोठ्या वल्गना या १९९० सालापासून सांगोला मतदार ऐकत आलेला आहे. होऊन जाऊ द्या. एकदा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत दूध का दूध आणि पानी का पानी दिसून येईल, असे मत नागरिकांतून व्यक्त होत आहे

भाजपाने या निवडणुकीत उमेदवार उभे केले आहेत. भाजपाची सध्या ताकद मोठ्या प्रमाणात वाढली आहे. केंद्रात, राज्यात व जिल्ह्यात सत्ता सध्या भाजपकडे असल्याने व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा -देवेंद्र फडणवीस यांच्या कणखर धोरणामुळे मतदार सध्या भाजपावर प्रभावित असल्याचे दिसत आहे त्यामध्ये खासदार रणजीतसिंह नाईक निंबाळकर यांचा तालुका जनसंपर्क दौरा प्रभावित झाल्याने भाजपालाही कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत चार तरी जागा सहजासहजी मिळतील, अशी आशा भाजपाचे नेते खाजगीत व्यक्त करीत आहेत.

# वंचित विकास आघाडीचा जोर वाढतोय?

**उल्हास पाटील**

**कुर्डूवाडी नगरपालिकेत अनेक वर्षापासून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) पक्षाचे वर्चस्व असून नगरपालिकेमध्ये रिपाइंचे नगरसेवक निवडून येत आहेत. यावर्षी वंचित बहुजन विकास आघाडीचा जोर वाढत असल्याचे दिसून येत असून याच्या पाठीमागे कुणाची छुपी ताकद लागली आहे, याची चर्चा होत आहे. वंचित विकास आघाडीच्या माध्यमातून कोणाला शह देणार, अशी चर्चा सुरू झाली आहे.**

कुर्डूवाडी रेल्वे जंक्शन म्हणून ओळखले जात आहे. कुर्डूवाडी शहर व रेल्वे कॉलनी असे शहराचे दोन भाग पडले असून रेल्वे कॉलनी परिसरात प्रथम दलित पँथर संघटना स्थापन होऊन त्यांचे वर्चस्व वाढवण्यास सुरुवात झाली होती. नगरपालिका स्थापन झाल्यानंतर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गट पक्षाची निर्मिती झाली व कुर्डूवाडी शहरातही त्यांचे पदार्पण झाले. यानंतर नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये सहभागी होऊन नगरपालिकेमध्ये नगरसेवक म्हणून चंचू प्रवेश सुरू झाला. त्यानंतर नगरपालिकेत आज रिपाईचे तीन ते चार नगरसेवक नगरपालिकेमध्ये दिसू लागले. अनेक वर्षापासून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे नगरसेवक सत्यदारांचे घटक बनू लागले तर रिपाईच्या नगरसेवकांनी उपनगराध्यक्ष पदही मिळवले होते. कुर्डूवाडी नगरपालिकेच्या मागील पंचवार्षिक निवडणुकीमध्ये शिवसेना विरुद्ध आमदार संजय शिंदे गट व रिपाइं अशी प्रमुख लढत झाली. यामध्ये शिवसेनेचे नगराध्यक्षसह एक अपक्ष नगरसेवक घेऊन शिवसेनेची नगरपालिकेवर सत्ता मिळवली होती. गेल्या पाच वर्षांमध्ये अनेक विकास कामे झाली. या दरम्यान सत्ताधारी व विरोधात मतभेद वाढत गेले. यामध्ये अधिक मतभेद कोणाबरोबर झाले, हे सर्वांना माहीत आहे. कोरोनामुळे नगरपालिका निवडणूक लांबणीवर पडल्या आणि शहरात गेल्या पाच सहा महिन्यांपासून वंचित बहुजन विकास आघाडीची शहरात स्थापना झाली व सर्व शहरांमध्ये सार्वजनिक कार्यक्रमामध्ये आघाडी घेत असल्याचे दिसून येत आहे.

### नगरपालिकेत चंचू प्रवेश करणार का?

यावर्षीच्या निवडणुकीत वंचित बहुजन आघाडी कोणासोबत जाणार कोणत्या पक्षाबाबत चर्चा सुरू आहे हे मात्र अद्याप समजू शकले नाही. मात्र या आघाडीला कोणाचे आर्थिक पाठबळ व छुपा पाठिंबा आहे. याबाबत सर्वत्र चर्चा सुरू झाली आहे. या आघाडीच्या माध्यमातून कोणाला शह देणार व सत्तेचे बेरजेचे राजकारण केले जाणार याचेही चित्र आगामी निवडणुकीत चित्र स्पष्ट होईल. मात्र वंचित बहुजन आघाडी ही बळकट होऊन नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये जोमाने उतरून नगरपालिकेत चंचू प्रवेश करेल, असे बोलले जात आहे.

# गटबाजी विरहित सक्षम विश्वासू-अनुभवी नेतृत्वाची गरज

**संजय आठवले**

मोहोळ तालुक्यात काँग्रेस बळकट होण्यासाठी गटबाजी विरहित सक्षम विश्वासू अनुभवी नेतृत्वाची गरज असून याकडे जिल्हयातील प्रमुख नेत्यांनी लक्ष देण्याची गरज आहे



मोहोळ तालुक्यात एकेकाळी काँग्रेस आय हा एकमेव मोठा अन् प्रभावी पक्ष होता. तालुक्यात काँग्रेस पक्षाशीवाय पर्याय नव्हता. देश भक्त संभाजीराव गरड, माजी मंत्री शहाजीराव पाटील, ए आर डी शेख यांचा शब्द काँग्रेस पक्षात प्रमाण मानला जायचा परंतु काँग्रेसमध्ये फूट पडून राष्ट्रवादी काँग्रेस वेगळी झाली. त्याच बरोबर त्यावेळचे काँग्रेसचे विद्यमान आमदार राजन पाटील यांनीही राष्ट्रवादी काँगसची वाट धरली. त्यामुळे काँग्रेसचा मोठा गट विद्यमान आमदार राजन पाटील यांच्या सोबत गेला. तेव्हापासून मोहोळ तालुक्यातील काँग्रेसला घरघर लागली. त्यानंतर काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्षपद बाबासाहेब क्षीरसागर, ए आर डी शेख, सुभाष पाटील, राजेश पवार, अशोक देशमुख आदींनी भूषवले. सध्या सुरेश शिवपुजे हे विद्यमान तालुका अध्यक्ष आहेत. ते शांत अन संयमी स्वभावाचे आहेत. मागील काही दिवसांपूर्वी तालुका अध्यक्ष नावाने सुरेश शिवपुजे यांनी मोहोळ येथे पत्रकार परिषद घेतली तर सुलेमान तांबोळी यांनी घोडेश्वर येथे तालुका अध्यक्ष म्हणून पत्रकार परिषद घेतली. त्यामुळे काँग्रेस पक्षातील गटबाजी चव्हाट्यावर आली.

सध्या विद्यमान तालुका अध्यक्षपद सुरेश शिवपुजे यांच्याकडे असले तरी पत्रकार परिषदा मोर्चामध्ये बहुतांशी शहर अध्यक्ष किशोर पवार हेच तालुका अध्यक्ष असल्याचा भास होतो आहे. त्याच पद्धतीने त्यांची वर्तणूक असते. पत्रकारांना तेच बाईट देतात तेच माहिती देतात. त्यामुळे नेमके तालुका अध्यक्ष कोण ? किशोर पवार की? सुरेश शिवपुजे, सुलेमान तांबोळी? असा प्रश्न निर्माण होते त्यामुळे राजेश पवार यांनी मोहोळ तालुका अध्यक्ष असताना त्यांनी समतोल साधला होता. तालुक्याच्या घोडेश्वर व मोहोळ दोन्हीही भागाला समान न्याय देत होते. सध्या त्यांच्यावर जिल्हयातील जबाबदारी आहे. त्यामुळे पक्ष श्रेष्ठी काय निर्णय घेणार ? त्यांना परत तालुक्यात आणणार काय?

# गुजरात पॅटर्नमुळे युवक नेत्यांच्या इच्छा बळावल्या...

**डी.एस.गायकवाड**

**सध्या महाराष्ट्रातील राजकारणामध्ये गदारोळ माजलेला दिसतो आहे. मागील दोन वर्षाच्या कालखंडातील भाजपची असणारी स्थिती सध्या राहिलेली दिसत नाही. शिक्षक, पदवीधर निवडणूक असेल किंवा नुकतीच झालेली कसबा निवडणूक असेल यामध्ये भाजप पिछाडीवर असल्याचे चित्र आहे. त्यामुळेच महाराष्ट्रामध्ये देखील गुजरात पॅटर्न राबवला जाण्याची चिन्हे स्पष्टपणे दिसू लागली असून सोलापूर जिल्ह्यातील युवक नेत्यांच्या इच्छा यामुळे बळावलेल्या दिसत आहेत.**

दररोजचे विकोपाला जात असलेले वाद यामुळे राज्यातील जनता त्रस्त दिसत आहे आणि याला शिंदे फडणवीस सरकार जबाबदार असल्याचे आज उघड उघड बोलले जात आहे. अशातच कसबा सारख्या मतदार संघात ब्राह्मण वर्ग मोठ्या संख्येने असताना देखील भाजपाला पराभवाची चव चाखायला लावली. पिंपरी चिंचवड मध्ये देखील भाजपाला यश आले असले तरी कलाटे यांनी बंडखोरी केली नसती तर तिथेही भाजपाला पराभवाला सामोरे जावे लागले असते, असे बोलले जाते. शिक्षक पदवीधरमध्ये नागपूर मतदारसंघात भाजपाचा पराभव झाला. अशामुळे भाजपा सध्या बॅकफूटवर जाताना दिसते आहे. अशा अवस्थेत वर्षभरावर आलेल्या विधानसभा,लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपाला जिंकायचे असेल तर नवीन चेहरे देणे कमप्राप्त होणार आहे आणि तो प्रयोग भाजपाने गुजरातमध्ये यशस्वी करून दाखवला आहे.

गुजरातमध्ये भाजपने १८२ जागा पैकी १०३ नवखे उमेदवार दिले याचा फायदा असा झाला की, एकूण १५६ जागांवर भाजप निवडून आला. असाच प्रयोग आता महाराष्ट्रात देखील भाजप करणार असल्याचे स्पष्टपणे दिसू लागले आहे. यातूनच राज्याच्या राजकारणात भाजपाचे नवीन चेहरे समोर येताना दिसत आहेत. ते गुजरात पॅटर्नच्या माध्यमातून आपल्याला संधी मिळेल या भूमिकेतूनच कार्य करताना दिसत आहेत. सोलापूर जिल्ह्यामध्ये देखील यापेक्षा वेगळी स्थिती नाही. भाजपाचे संघटन महामंत्री धैर्यशील मोहिते पाटील ही यातील आघाडीवरचे नाव वाटते आहे. गुजरात पॅटर्न राबवला तर त्यांना मोठा फायदा होऊ शकतो. त्यांना माढा लोकसभेच्या रिंगणात उतरवून त्यांच्या कामाची पोच पावती दिली जाऊ शकते. मोहोळचे अनगरकर देखील अनेक दिवसांपासून सत्तेपासून वंचित आहेत त्यांनाही भाजपामध्ये घेऊन बाळराजे पाटील यांना योग्य ठिकाणी संधी दिली जाऊ शकते.

आमदार बबनराव शिंदे देखील भाजपमध्ये प्रवेश करून आपले सुपुत्र रणजितसिंह शिंदे यांना माढा विधानसभेसाठी नवा चेहरा म्हणून उमेदवार म्हणून पुढे आणू शकतात. पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघासाठी देखील उमेश परिचारक यांचे नाव पुढे येऊ शकते.









### घराण्यातील मुलांचा कल भाजपाकडे

सोलापूर जिल्ह्याची विचारधारा काँग्रेसची असली तरी सध्याची नवीन पिढी मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाने भारावलेली दिसते आहे. देशात घडत असलेल्या नवीन बदलांची नोंद ठेवत भाजपाकडे ही युवक मंडळी आकर्षिली जात असल्याचे चित्र आहे. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील राजकीय घराण्यातील मुलांचा भाजपाकडे कल वाढताना दिसत आहे.आपण पक्षासाठी प्रामाणिक योगदान दिले तर आपल्याला मोठी संधी प्राप्त होऊ शकते या आशेपोटी जिल्ह्यातील युवक नेतृत्वाची फळी सक्रियपणे कार्य करताना दिसते आहे.

### फडणवीसांच्या भूमिकेकडे लक्ष

सोलापूर जिल्ह्यामध्ये भाजपाची भक्कम परिस्थिती आहे. अशा वातावरणात जुन्यांना संधी देऊन राज्यातील स्थितीचा परिणाम हक्काच्या जिल्ह्यावर व्हायला नको ,वातावरण गढूळ व्हायला नको, रिस्क नको अशा तयारीतही भाजप वागू शकते. सोलापूर जिल्ह्यावर देवेंद्र फडणवीस यांचे लक्ष असल्याने व प्रभारी पदावर तेच कार्यरत असल्याने वरिष्ठ पातळीवरील आदेशानुसार ते देखील अकरा विधानसभा मतदारसंघात नवीन चेहऱ्यांचा डाव खेळतील, असा अंदाज आहे.